# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

### दिनांक ३०/३/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२६) इतिवृत्त

**शुक्रवार** दिनांक **३० मार्च २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी १२.१५ वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. गायकवाड दिलीप नारायण
2. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
3. सौ. दलाल लता श्रीनिवास
4. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
5. श्री. मुजीब आलमशाह खान
6. श्री. पांडे विनायक प्रभाकर
7. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
8. सावंत मधुकर दामोधर
9. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
10. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
11. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
12. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

<u>**संवाद :**</u>

डॉ. आशा बिनवडे : २२ तारखेला या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.साहेबराव कावडे(मामा)यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करून शोक संदेश त्यांचे कुटूंबीयांना पाठविण्याची व्यवस्था करावी.

सौ. लता दलाल<br>श्री.मधुकर सावंत : यास माझे अनुमोदन आहे. शोकसंदेश पाठवावा.

मा. सभापती : ज्येष्ठ सदस्य स्व.श्री.कावडे मामा यांना दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी उभे रहावे. सभागृहाच्या वतीने त्यांचे कुटूंबीयांना शोक संदेश पाठविण्याची व्यवस्था करावी.

(याच वेळी स्व. श्री. साहेबराव कावडे, (मामा)यांचे दु:खद निधनाबद्दल सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

श्री. मुजेब खान : सभापती म्हणून आपला एक वर्षाचा कार्यकाळ पूर्ण होत आहे. एक वर्षात जेनिर्णय आपण घेतले त्यातील काही कामे झाली नाही जी झाली त्याबद्दल आपले अभिनंदन. चंपा मस्जेद रोशनगेट ते रविंद्रनगर तसेच आझाद चौक पर्यंत अनेक जगा महापालिकेने संपादीत केल्या. जगेचा मोबदला दिला परंतू तेथील अतिक्रमण काढले नाही. सिकंदर पार्कचे मोठे अनधिकृत काम रस्त्यावर झाले दुकाने बांधली.मोतीवाला

हॉलच्या बाजूला खुल्या जगेवर अतिक्रमण झाले दोन वर्षापासून प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत आहे कार्यवाही केली नाही. बिल्डराचे असेल तर काढले जत नाही गरीबांचे तातडीने काढले जते. खुलासा होणे गरजेचे आहे.

श्री.विनायक पांडे : विद्यापीठ गेट समोरील रस्त्यावर जेअतिक्रमण झाले ते त्वरीत काढण्याची कार्यवाही व्हावी. कुलगुरूंचे या संदर्भात मनपाला पत्रही आलेले आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : महापालिकेच्या जगेवर मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे. मुथीयान कॉर्नर येथे एका व्यक्तीने  जगेचा मोबदला घेतला मोबदला देतांना त्यांना धनादेश देण्यात आला त्याचा नंबर मी मागितला. अद्याप लेखा विभागाने दिलेला नाही. तसेच एकनाथनगर डी.पी. रोडवर १५×१५ च्या लोखंडी टपऱ्यांचे अतिक्रमण केलेले आहे. वेळोवेळी ते काढण्या संदर्भात मागणी केली  त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे.वेळीच काढले नाही तर इतर जगेवर मोठया प्रमाणात अतिक्रमणे होतील यात शंका नाही.

श्री.संजय शिरसाट : अतिक्रमणाच्या संदर्भात प्रत्येक बैठकीत स.सदस्यांनी चर्चा केली. वृत्तपत्रात ही तशा बातम्या येतात आजच्या वृत्तपत्रात पहिल्याच पानावर दिले की घाटी दवाखान्यात अंबुलन्स वाहन जण्यासाठी रस्ता नाही इतके अतिक्रमण झालेले आहे. घाटी परीसरातील अतिक्रमण का काढले जत नाही शहरात अनेक ठिकाणी अतिक्रणाच्या बाबतीत मोहिम राबविल्या, रस्ता रूंद करून फुटपाथ केले. निराला बाजर भागात फुटपॉथ जवळ रस्त्यावर वाहने उभी केली जतात ४० फुटाचा रस्ता २० फुट झालेला आहे. तसेच फुटपॉथवर अनेक लोकांनी स्टॉल लावून व्यवसाय सूरू केलेले आहे.

उपआयुक्त (म.) : मोतीवाला ओपन स्पेसच्या संदर्भात संबधीत संस्थेचे ट्रस्टी  श्री.मोतीवाला यांचेशी चर्चा केली होती. समोरचे जेदोन प्लॉट आहे त्यांचे आहे ते महापालिकेला देवून मागिल जे १० फुट जगा ती त्यांना द्यावी असा प्रस्ताव होता. त्यांचे पीआर कार्ड झालेले आहे त्यात पाच ते सहा वर्षापूर्वी करेक्शन झालेले आहे. या संबधी मा.आयुक्तांसमोर चर्चा झाली होती त्यास अजूनही अंतिम स्वरूप मिळालेले नाही.

श्री.मुजेब खान : महापालिकेचे लेआऊट  मधील खूल्या जगेवर अतिक्रमण झालेले  प्रत्यक्ष दिसून येते. वाटाघाटी करून फेरबदल करायचे १० टक्केवरून १५ टक्के व पून्हा १० टक्के असे दोन दोन वेळेस लेआऊटमध्ये फेर करण्यात आलेले आहे.पूर्वीचा लेआऊट व आता केलेला बदल  फरक दिसून येतो. लेआऊटचा रस्ता व ओपनस्पेस क्लिअर महापालिकेने बॉन्ड्रीसाठी परवानगी दिली होती. दुरूस्ती केल्यानंतर महानगरपालिकेचे ओपनस्पेसचे पी. आर कार्ड पून्हा स्वत: च्या नावावर करून घेतले. हि दिशाभूल झालेली आहे किती दिवस असा प्रकार चालणार आहे.एक क्लिअर ओपनस्पेस महानगरपालिका करून देते. एक ओपनस्पेस आहे डी. पी रोड आहे अशी कामे होत नसेल तर इंन्टरनल कामे कशी होतील. सिकंदर पार्क इमारतीसमोर दुकाने व वरच्या मजल्यावर फ्लॅट काढलेले आहे. पाठीमागिल नागरीकांना मोठा  त्रास आहे. अतिक्रमण विभागात जेकर्मचारी आहे ते काम करण्यास सक्षम नाही. पूर्वी जेहोते त्यांना घेण्यात यावे. हा विभाग सक्षम करावा. नवीन पथक निर्माण करावे.या शहरातील अतिक्रमण करणाऱ्यावर प्रशासकीय विभागाचा वचक असला पाहिजे

मा. आयुक्त : १ एप्रिल पासून प्रभाग अधिकारी यांना देणार आहे.

उपआयुक्त(म.) : घाटी येथील ६० ते ७० अतिक्रमण मागिल वेळी काढण्यात आले होते. दर आठ ते दहा दिवसातून एकदा कार्यवाही करतो परंतू पुन्हा त्या जगेवर अतिक्रमण होते.

श्री.संजय सिरसाट : रोजच्या रोज घाटी परीसरातील अतिक्रमण काढू शकणार नाही तेथे अनेक ट्राफिक असते.हे जरी सत्य असले तरी स. सदस्य यांनी मुद्या माडंल्यानूसार मोतीवाला यांनी निरालाबाजर भागात २० हजर क्वे.फुट फ्लोटींग एफएसआय वापरला. एक टपरी काढण्यासाठी पोलीसांचा ताफा तेथे जतो अधिकारी त्यास मदत करीत होते त्या व्यक्तीने १००००/- रू. भरणा केले मला माझा उदरनिर्वाह करू द्या म्हणून ते अतिक्रमण तसेच ठेवले. घाटी परीसरातील रस्त्यावरमोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. लोकांना ज- ये करण्यासाठी रस्ता नाही आणि अधिकारी सांगतात दर दहा दिवसाला काढले जते असे उत्तर देतात. कोकणवाडी भागात महानगरपालिकेच्या मालकीची एक कोटीची जगा आहे. तेथे मोठे अतिक्रमण झाले दोन वर्षापासून निदर्शनास आणून देत आहे, कागदपत्र दाखवले, अतिक्रमण काढले नाही. ज्या ठिकाणी अधिकाऱ्यांचे हितसंबध गुंतलेले असतात तेथील अतिक्रमण काढले जत नाही असा माझा आरोप आहे. रस्त्यावर २५-३० वाहने लावली जतात. आपण फुटपाथ कशासाठी केला?

मा. आयुक्त : घाटी येथील अतिक्रमणाबाबत घाटी प्रशासनाशी अनेक वेळा चर्चा केली. या भागात रूग्णांची गरज आहे. घाटीतील जे रूग्ण आहे त्यांचेसाठी ते तितकेच गरजेचे आहे. रूग्णासाठी तेथे फळे व खाद्यपदार्थ विकत घेतले जते तेथील अतिक्रमण काढल्यानंतर सूध्दा परत येतात. रस्त्यावर अतिक्रमण न होण्यासाठी दोन सुरक्षारक्षक नियुक्त करू.१० हजर खर्च येईल. दुसरा मार्ग असा की घाटीच्या आंत त्यांनी एक मार्केट करून तेथे जेवण व फळाचे स्टॉल असावयास पाहिजे ज्यामुळे रूग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्या गरज पूर्ण होतील. त्यासाठी अनेक वेळा सूचना केली परंतू त्याची दखल घेतलेली नाही.घाटी क्षेत्राच्या आत मार्केट झाले तर सोयीस्कर होवून हा प्रश्न सूटेल.

श्री.संजय शिरसाट : अशी सहानूभूती विचार केला तर बसस्टॅण्ड वर जे रात्री बेरात्री पॅसेंजर उतरतात त्यांनाही हॉटेलमध्ये दुर जण्यास त्रास होतो म्हणून तेही रस्त्यावरच बाजूलाच गाडया उभ्या करतात.तेथेही रस्त्यावरच टपऱ्या असाव्यात का ? मा. न्यायालयात वकील दिवसभर असतात कोर्टाचे कामकाज चालू असते वकील व पक्षकार यांना दिवसभर थांबावे लागते म्हणून त्याची जेवणाची सोय होण्यासाठी कोर्टासमोर अतिक्रमण होवू देणार का? असा व्यक्ती सुध्दा रूग्णच आहे कोर्टात येणारा न्याय मिळविण्यासाठी येतो घाटीतील व्यक्ती दुरूस्तीसाठी येतो.अतिक्रमण होवू नये म्हणून ठिक ठिकाणी सुरक्षा रक्षक ठेवून पगार देणार तर प्रशासकीय विभाग कशासाठी आहे.त्या लोकांना झोनींग करून देणार नाही. त्यांना तेथे बसविण्यास प्रशासन प्रोत्साहन देत असेल व तेथील अतिक्रमण काढत नसेल तर योग्य नाही. आजअतिक्रमण कधी काढणार.

मा. आयुक्त : प्रशासन अतिक्रमण हटविण्याकडे पाहात नाही असे नाही. जगेवर अतिक्रमण काढले तरी पून्हा पाच सहा दिवसात कूणीतरी येवून बसण्याची शक्यता आहेतच. त्यासाठी पॉलीसी ठरवावी लागेल. आपण अतिक्रमण काढू, काही दिवसांनी पुन्हा होईल किंवा सतत लक्ष ठेवावे लागेल. सभागृहाने योग्य मार्ग काढावा त्याची अमलबजवणी केली

जईल. निराला बाजर येथे पे अँड पार्कीगला परवानगी द्यावी. संबधीताची ती जबाबदारी राहील.

श्री. संजय शिरसाट : आपण म्हणता अंमलबजवणी केली जईल. परंतु प्रशासकीय अधिकारी व श्री.आनंदकर अंमलबजवणी करीत नाही. असे होत असेल तर योग्य नाही.

सौ. लता दलाल : पे अँड पार्कीगसाठी जगा नाही. आताच स.सदस्य श्री. सिरसाट यांनी म्हटल्याप्रमाणे संबधीत मालकाने इमारत बांधली परंतू पार्कीगसाठी कूठेही जगा सोडलेली नाही.

मा. आयुक्त : परवानगी देतांना जेथे पार्कींग दाखवले आहे तेथे ते असावयास पाहिजेसंबधीत मालकाची ती जबाबदारी आहे.निराला बाजरच्या संदर्भात अतिक्रमण काढण्याची कार्यवाही उदयाच पोलीस बदोबस्त घेवून कार्यवाही होईल. रस्त्यावर जी वाहने उभी राहतात त्यासाठी पे अँड पार्कींग केल्यास संबधीत मालकाची ती जबाबदारी राहील ते वाहने कशी उभी करायचे याची सवय लावतील.

श्री.मधुकर सावंत : पे अँड पार्कसाठी जगा नाही तरपैसे कोण देणार. महानगरपालिकेने रस्ते करावे. वाहने उभी केल्यास पैसे वसूल करावे.

मा. आयुक्त : आताही लोक वाहने उभी करतातच.

सौ. लता दलाल : याचा अर्थ कूणीही यावे बाधांकम करावे. पार्कीगसाठी जगा ठेवू नये. फ्लोटींग एफएसआय वापरावा. रस्त्याच्या बाजूला डाबरीकरणाच्या बाजूला जी साईड मार्जीन असते तेथे त्या लोकांनी सिमेंन्ट टाकून वाहने उभी करावीका हे बरोबर नाही.

मा. आयुक्त : जेपर्टीकूलर एका इमारतीच्या पार्कीग बाबत आजसंबधीतास बोलवून घेवून कार्यवाही करू. परंतू जेलोक रस्त्यावर वाहने उभी करतात त्यांना शिस्त लावण्यासाठी हा एक उपाय आहे.

सौ. लता दलाल : ज्या ज्या भागात मार्केटच्या ठिकाणी मोठमोठया इमारती झाल्या त्यांना पार्कीग करणे का सक्तीचे केले नाही. दोन चार लोकांवर कार्यवाही केली असती तर ही वेळ आली नसती.

मा. आयुक्त :ज्यांना पार्कीग म्हणून परवानगी दिली त्यांचे पूर्ववत करणे तसेच रस्त्यावर होणारी पार्कीग तसेच हातगाडया या तिन्ही प्रश्नाकडे लक्ष दयावे लागेल.

सौ. लता दलाल : ज्यावेळी या सभागृहात अतिक्रमणाच्या बाबतीत तक्रारी केल्या जतात जेमोठे लोक असतात त्यांचेवर कार्यवाही न होता गरीबांच्या टपऱ्या, हातगाडीवाले यांचेवर कार्यवाही होते. यामूळे नागरीकांच्या मनात वेगळी भावना निर्माण होते की नगरसेवक हे गरीबांच्या विरोधात बोलतात. आताच प्रशासनाने खूलासा केला की घाटी दवाखान्याच्या परीसरात सुरक्षा रक्षक देणार, असे किती ठिकाणी कर्मचारी देवून महानगरपालिकेचा खर्च वाढविणार व प्रशासकीय विभागाचे काम काय आहे. एक पथकासह एक वाहन फिरते ठेवावे अशा प्रकारची उपाययोजना केली तर योग्य होईल.

मा. आयुक्त : अतिक्रमण रोखण्यासाठी महापालिकेला खर्च करावाच लागणार आहे. अतिक्रमण न होवू देण्यासाठी सुरक्षा रक्षक ठेवत आहोत.

श्री.मुजीब खान :अतिक्रमण रोखण्यासाठी एक पथक तयार करावे.घाटी दवाखान्यात ग्रामीन भागातील लोक असतात त्यांना खान्याचे वस्तू रस्त्यावरच मिळतात त्याची व्यवस्था होते परंतू रस्त्यावर अतिक्रमण होते ते न होवू देता.या लोकांसाठी घाटी परीसरात जगा उपलब्ध होत असेल तर महानगरपालिकेकडून बजेट कमी पडत असेल तर १०३

नगरसेवकाच्या निधीतून प्रत्येकी ५० हजर घेवून मार्केट तयार केले तर मोठे काम होईल.

मा. सभापती : सर्वांची भावना हीच आहे की शहरात अतिक्रमण असू नये. या संबधी अनेक वेळा या सभागृहात विविध ठिकाणच्या अतिक्रमणा संबधी चर्चा झालेली होती. अतिक्रमण विभाग सक्षम असल्याशिवाय हे काम योग्य पध्दतीने होणार नाही. असे वाटते मा. आयुक्तांना सूचना करण्यात येते की किमान १ एप्रिल पासून तरी प्रशासकीय विभाग सक्षम करण्याची कार्यवाही करावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : शालेय विदयर्थ्यांना गणवेश दिले बूट ही देण्यात आले काही शाळेत दिले काही शाळेत मिळालेच नाही ज्यांना मिळाले त्या विदयार्थ्यांना लहान मोठे होत आहे. काहींना सॉक्स मोठे होत आहे. असे बूट व गणवेश परत पाठवून बदलून देणार आहात किंवा कसे.

मा. आयुक्त : काळया रंगाचे बूट सर्व विद्यार्थ्यांसाठी मिळालेले आहे. पांढरे बूट ८०% आले, बाकीचे दोन चार दिवसात पुरवठा होतील. तसेच एक एक नंबरचे सॅम्पल देवून कोणत्या वर्गातील मूलांना कोणत्या नंबरचे बूट व सॉक्स येतात म्हणून तपासून घेण्यास सांगितलेले होते.

श्री.मुजेब खान : शालेय साहित्य वाटपाच्या संदर्भात भांडार विभागाची चौकशी करण्याचे आदेशीत केले होते अद्याप अहवाल समोर आलेला नाही.शाळेतून केलेली मागणी व साहित्यांचा भाडांर विभातून झालेला पूरवठा ५० ठक्केच होत होता  मोठी तफावत आहे.लेखा परीक्षण अहवालात सूध्दा आलेले होते की मागणी १५ व दिले सात. परंतु रेकॉर्डवर १५ आहे.

श्री.दिलीप गायकवाड : माझ्या वार्डातील एक व्यक्ती श्री. पाशाभाई पटेल हर्सूल यांचे  झी धाब्याच्या पाठीमागिल  इमारतीवरून पडून मृत्यू झाला त्या इमारतीला बांधकाम परवानगी दिलेली होती का?दिलेली नसेल तर संबधीत मालकावर काय कार्यवाही करणार आहे.

मा. आयुक्त : अनधिकृत बांधकाम केलेले असेल तर नियमानुसार कार्यवाही केली जईल.

**<u>विषय क्र.319 :</u>**

दिनांक **24/1/2007**(का.प.क्र.20) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : विद्युत विभागातील लाईनमन श्री. वाघ यांची वार्षिक वेतनवाढ थांबविण्यात आलेली होती. ती पुर्ववत चालू करण्या संबधी या स्थायी समितीचे ठराव पारीत केला त्याची अमलबजवणी करण्यात आलेली नाही.

मा. सभापती :आताच केलेल्या सुचनेनुसार प्रशासनाने संबधीत कर्मचारी यांची वेतनवाढ देण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : स्मृतीवन उद्यान मध्ये थोर पुरूषाचे मुर्ती ठेवलेल्या आहे. त्याची विटबंना होत आहे म्हणून अनेक वेळा मी मुद्या या सभागृहात मांडला या उद्यान साठी बजेट मध्ये तरतूद ठेवू असे म्हटले होते परंतू ठेवली नाही. सन १९५४ पासून या तलावातून शहराला पाणीपूरवठा होतो. तलावासाठी उद्यानसाठी बजेट मध्ये कूठेही तरतूद केलेली नाही. ती

करण्यास यावी या कामाच्या अमलबजवणीसाठी प्रशासनास ठराविक वेळ निश्चित करून दयावा.तसेच खामनदीवरील अतिक्रमण काढले नाही. सिडको हस्तांतरण होवून एक वर्ष झाले. मुस्लीम कब्रस्तान मध्ये अतिक्रमण झाले ते अद्याप काढले नाही. येत्या १० दिवसात कार्यवाही करण्यासाठी प्रयत्न करावे.

मा. सभापती : प्रशासनाने यांची नोंद घ्यावी योग्य ती कार्यवाही करावी इतिवृत्तास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक **24/1/2007** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.320 :** (दि.20-3-2007 च्या सभेतील{का.प.क्र.25}स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव-विषय क्र. 299)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील जलनिःसारण व्यवस्था ही जुनी झाली असून शहरात असलेल्या नाल्यातील मुख्य जलनिःसारण वाहिन्या मोठ्या प्रमाणात नादुरूस्त असल्याने या नाल्यात मोठ्या प्रमाणात मलमिश्रीत सांडपाणी वाहत आहे. शहराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने जुनी ड्रेनेज व्यवस्था तोकडी पडत आहे. नाल्यामधुन वाहणाऱ्या मलमिश्रीत पाण्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. मलमिश्रीत सांडपाण्यामुळे शहरात संसर्गजन्य, साथीचे रोग पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. महानगरपालिका क्षेत्रातील नाल्यातुन वाहणारे प्रदुषीत पाणी पुढे खाम नदीद्वारे गोदावरी नदीस मिळते, ज्यामुळे प्रदुषण महानगरपालिका क्षेत्रा व्यतिरिक्त लगतच्या खेड्यातही पसरत असल्यामुळे महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे महानगरपालिकेस वारंवार सुचनेद्वारे/नोटीस द्वारे असे कळविण्यात येत आहे की, नदी/नाल्यात वाहत असलेल्या मलमिश्रीत सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया करून, शुध्द झाल्यानंतरच नैसर्गिक नाला/नदीत सोडण्यात यावे आणि तसे औरंगाबाद महानगरपालिकेकडून हमीपत्र मागविण्यात येत आहे.करिता औरंगाबाद शहरातील अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज व्यवस्थेचा स्तर उंचावणे, आवश्यक ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे आणि मलजलशुध्दीकरण प्रक्रिया केंद्र बांधणे, दुषित ड्रेनेज पाणी नाल्यात वाहु न देणे, पर्यावरणाचा समतोल राखणे इत्यादी कामे करणे अत्यंत गरजेचे आहे.

औरंगाबाद शहरा करीता प्रथमत: 1972 साली भुमीगत जलनिःसारण योजना कार्यान्वित करण्यात आली. सदर योजना परिसर अभियांत्रिकी विभाग (म.जि.प्रा.) यांचे मार्फत पुर्ण करून तत्कालीन नगर परिषदेस हस्तांतरीत करण्यात आली. या शहराची लोकसंख्या सन 2001 मध्ये दोन लाख होईल असे गृहीत धरून ही योजना तयार करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात सन 1981 मध्ये शहराची लोकसंख्या 2 लक्ष पेक्षा जास्त झाली. आजमितीस शहराची लोकसंख्या अंदाजे दहा ते बारा लाखा पेक्षा जास्त झाली आहे. 1972 मधील जलनिःसारण व्यवस्थे मार्फत जमा होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी कांचनवाडी येथे ऑक्सीडेशन पॉंड विकसीत केलेले आहेत. सध्या ते बंद अवस्थेत पडून आहे.

सन 1982 साली महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर वाढते औद्योगिकीकरण व नागरिकरणामुळे हाणाऱ्या वाढीव लोकसंख्येचा विचार करून भविष्यातील सेवा सुविधा करिता शहा कन्सल्टंट, मुंबई यांचेकडून 1986 साली जलनिःसारण योजनेसाठी अहवाल तयार करून घेण्यात आला. त्यावेळी सदर योजनेचा अपेक्षित खर्च रू.65.26 कोटी होता. वेळोवेळी पुरेशी आर्थिक तरतुद उपलब्ध न झाल्यामुळे सदर योजना पूर्णपणे राबविणे, अंमलात आणणे शक्य झाले नाही. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी या योजनेतील काही मुख्य जलनिःसारण वाहिन्या, उप जलनिःसारण वाहिन्या व झाल्टा शिवारात मलजल शुध्दीकरण प्रक्रिया केंद्राचे काम टप्प्या टप्प्याने उपलब्ध तरतुदीनुसार हाती घेण्यात आले आहे.

अपूर्ण असलेल्या, कोलमडीस आलेल्या आणि नादुरूस्त मुख्य जलनिःसारण वाहिन्यामधून उघड्या नैसर्गिक नाल्यात आज मितीस साधारणत: 90 दशलक्ष लिटर्स(एमएलडी) सांडपाणी वाहते. याचा शहराच्या

व लगतच्या परिसराच्या पर्यावरणावर आणि भूगर्भातील जलसाठ्यावर तसेच जमीनीच्या सुपिकेतेवर देखील दूरगामी दुष्परिणाम होतात. या सर्व बाबी विचारात घेता सर्वसाधारण सभा विषय क्र.48/9 दिनांक 19-3-2003 चे ठरावानुसार शहरातील नाल्यातुन वाहून जाणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी अस्तित्वात असलेल्या ड्रेनेज व्यवस्थेचा स्तर उंचावणे, नविन ड्रेनेज व्यवस्था करणे, मेन सिव्हर लाईन टाकणे इत्यादी कामासाठी 170.00 कोटी रूपये तरतुद करणे व या कामासाठी कन्सल्टंट नेमणे असा निर्णय झालेलाआहे.

त्या अनुषंगाने दिनांक 4-11-2004 च्या स्थायी समिती ठराव क्र.116 अन्वये या कामासाठी सुमारे 170 कोटीचा निधी उभा करणे, स्पर्धेद्वारे येणाऱ्या कन्सल्टन्सीला द्यावयाचे शुल्क 2% दराने त्यांचेसह वाटाघाटी करून निश्चित करणे आणि त्यासाठी सन 2005-06 च्या अर्थसंकल्पात तरतुद करणेचा ठराव पारित झाला. त्याचप्रमाणे स्थायी समिती सभा दिनांक 24-8-2005 मधील ठराव क्र.42(ब) मधील ठरावानुसार औरंगाबाद शहरातील अस्तित्वातील जलनिःसारण योजना श्रेणीवाढ करून सुधारीत करणेसाठी प्रकल्प सल्लागार निवड करणेबाबत व त्यांना अदा करावयाचे शुल्क रू.3.40 कोटीचे खर्चास मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार योग्य सल्लागाराची निवड करणेसाठी निविदा मागविणे, निवडलेल्या सल्लागार कडून योजनेचा सविस्तर तांत्रिक अहवाल, नकाशे, अंदाजपत्रके तयार करणे, त्यांनी तयार केलेल्या अहवालास थर्ड पार्टी, मान्यता प्राप्त सक्षम संस्थेकडून तपासणी करून घेणे आणि निविदापत्रकातील नमूद तीन भाग टास्क-I, टास्क-II व टास्क-III प्रमाणे आहेत त्यानुसार कामे करून घेणेचे ठरले आहे.

उपरोक्तनुसार कामे करून घेण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्रकल्प संल्लागार निवड करणे करीता दिनांक 24-1-2006 रोजी निविदा काढण्यात आली. एकूण पाच कोऱ्या निविदा विक्री झाल्या आणि निविदा सादरीकरणच्या अंतिम दिवशी फक्त एकच वैप्को (WATER AND POWER CONSULTANCY SERVICES [INDIA] LTD.) यांची निविदा दर भरून प्राप्त झाली. दुसरे स्पर्धक महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांनी महाराष्ट्र शासनाकडे अपील करून काही अटी शिथील करून घेतल्या आणि दिनांक 7-11-2006 रोजी दर भरणा केलेली निविदा सादर केली.

वरील प्रमाणे प्राप्त दोन सिलबंद निविदा दिनांक 13/11/2007 रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **निविदा भरणाऱ्या सल्लागार संस्थेचे नांव** | **निविदेतील भरण्यात आलेली रक्कम रूपये** |
|---|---|---|
| 1. | WATER AND POWER CONSULTANCY SERVICES [INDIA] LTD. | **80,91,718/-** |
| 2. | महाराष्ट्र जिवन प्राधिकरण | **3,30,95,497/-** |

उपरोक्त प्रमाणे कमी दराची म्हणजेच रक्कम रू.80,91,718/- ची निविदा ही वैप्को WATER AND POWER CONSULTANCY SERVICES [INDIA] LTD. यांची आहे. ती स्विकारणेचा प्रस्ताव मंजुरीचे विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

मा. आयुक्त :प्रस्ताव ठेवला होता परंतू नंतर कळले की या एजन्सीने अमरावतीमध्ये चांगले काम केलेले नाही. असे कार्यकारी अभियंता श्री.पानझडे बोल होते आपलेही म्हणणे असेच असेल तर रिटेंडर करावे.

मा. सभापती : फेर निविदा मागविण्यात याव्यात.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील कामासाठी फेर निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.321 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, आरेफ कॉलनी येथील मुख्य रस्ता व डी.पी. रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.19,96,000/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात पुनर्डांबरीकरण या लेखा शिर्षातून करण्यात येत आहे. सदरील रस्त्याचे काम तीन वर्षापुर्वी करण्यात आलेले असून रस्त्याची एकूण लांबी 1688 मीटर आणि रूंदी साधारणपणे 5 मीटर आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे व स्थायी समितीचे मंजुरीस्तव सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

करीता सदरील कामासाठी अंदाजपत्रक र.रू.19,96,000/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरेफ कॉलनी येथील मुख्य रस्ता व डी.पी. रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,96,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.322 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर के आहे की, पडेगांव कत्तलखाना जवळ गट नं.668, 67 अंतर्गत नियोजित रेखांकन कॉलनी अंतर्गत रस्ते तयार करणेच्या कामासाठी सा.बां. विभागाच्या सन 2005-06 च्या दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.12,94,000/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2006-07या आर्थिक वर्षात नवीन खडी रस्ते या लेखा शिर्षातून करण्यात येत आहे. रस्त्याची एकूण लांबी 1387 मीटर आणि रूंदी साधारणपणे 9 मीटर आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केली असून स्थायी समितीचे मंजुरीस्तव सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

करीता सदरील कामासाठी अंदाजपत्रक र.रू.12,94,000/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव कत्तलखाना जवळ गट नं.668, 67 अंतर्गत नियोजित रेखांकन कॉलनी अंतर्गत रस्ते तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,94,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.323 :</u>**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन जवळील न.भु.क्र.19149 महानगरपालिकेच्या मालकीची जागा बोल्ट तत्वावर विकास करणेसाठी विकासक यांना देणे संबंधी करारनामा झालेला असून विकासक यांनी करारनामा अटी व शर्तीची पुर्तता केलेली असल्याने जागेचा ताबा देणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे.

यासाठी तेथील परिसरातील पडलेले साहित्य व लोखंड हलविणे आवश्यक आहे. परिसर रिकामे करून देण्याच्या दृष्टीने लोखंड विक्री करण्यासाठी दि.20-10-20036 रोजी वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्यात आली आहे व निविदा स्विकृतीची अंतिम तारीख दि.30-10-2006 होती.

निविदा स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी पर्यंत 2 निविदा प्राप्त झाल्या असून निविदा धारकांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

1) श्री.उत्तमराव रखमाजी काळे — रू.13176/- प्रती मेट्रीक टन

2) श्री.सयाजीराव दशरथ काळे — रू.12580/- प्रती मेट्रीक टन

प्राप्त निविदापैकी जास्त दर, श्री.उत्तमराव रखमाजी काळे यांचे दर रू.13176/- प्रती मेट्रीक टन असे आहेत. आठ ते दहा वर्षापुर्वीचे पडलेले लोखंड रू.13176/- प्रती मेट्रीक टन या दराप्रमाणे निविदा धारक श्री.उत्तमराव रखमाजी काळे यांना देणे साठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन जवळील न.भु.क्र.19149 महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील परिसरातील पडलेले साहित्य व लोखंड विक्री करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात जास्तीचे दर असलेले निदाधारक श्री.उत्तमराव रखमाजी काळे यांना सदरील लोखंड प्रति मे.टन रू.13176/- या दराने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.324 :</u>**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, औरंगपुरा भाजी मंडी येथील पिया मार्केट येथील शौचालय बोल्ट तत्वावर 30 वर्षाच्या करारावर सुलभ इंटरनॅशनल, मुंबई यांचे सोबत झालेल्या कराराप्रमाणे चालविणेसाठी निविदा मागविणे बद्दल निर्देश प्राप्त आहेत.

औरंगपुरा भाजी मंडी पिया मार्केट येथील शौचालय चालविण्यासाठी देणेकरीता जाहीर निविदा सुचना दिनांक 20-10-2006 रोजी जिल्हा पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. निविदा स्विकृतीची शेवटची तारीख दि.30-10-2006 होती.

निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांकापर्यंत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या असून निविदा धारक यांनी सदर शौचालय चालविणे साठी खालील दर नमूद केलेले आहेत.

1) श्री. रामप्रवेश विद्यार्थी सुगम सोशल सर्व्हीस रू.4000/- प्रति वर्ष
2) श्री. बबलू महेश गुप्ता रू.1000/- प्रति वर्ष

वर नमूद प्रमाणे श्री. रामप्रवेश विद्यार्थी सुगम सोशल सर्व्हीस यांचे दर रू.4000/- प्रति वर्ष सर्वात अधिक प्राप्त आहे.

पिया मार्केट येथ् मनपाच्या मालकीची 4 Seated Toilet Block and Urinal बांधलेली आहे. या शौचालयासाठी भाडेकरात सुलभ इंटरनॅशनल मुंबई यांचे सोबत झालेल्या कराराप्रमाणे व त्यातील अटी व शर्तीनुसार असून खालील मुद्यांचा समावेश आहे.

1) करार 30 वर्षासाठी असून निविदा धारकांनी दरवर्षी रू.4000/- प्रती वर्ष प्रमाणे ना परतावा रक्कम मनपाकडे जमा करावे व मोबदल्यात शौचालय वापरणाऱ्यांकडून सुलभ इंटरनॅशनल, मुंबईच्या धर्तीवर उपभोग शुल्क आकारावे.
2) शौचालयाची देखभाल दुरूस्ती व साफसफाई निविदा धारकावर बंधनकारक राहील.
3) या शौचालया सोबत स्लम भागातील क्रांतीनगर येथील शौचालयाची देखभाल दुरूस्ती व साफसफाई नागरीकांकडून पैसे वसूल न करता फ्री ऑफ चार्ज करावी लागेल.
4) इतर सर्व अटी व शर्ती सुलभ इंटरनॅशनल, मुंबई सोबत केलेल्या करारा प्रमाणे राहतील.

तरी पिया मार्केट येथील शौचालय 30 वर्षाच्या भाडे करारावर रू.4000/- प्रति वर्ष प्रमाणे श्री. रामप्रवेश विद्यार्थी सुगम सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन यांना देणेसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगपुरा भाजी मंडी येथील पिया मार्केट येथील शौचालय बोल्ट तत्वावर 30 वर्षाच्या करारावर सुलभ इंटरनॅशनल, मुंबई यांचे सोबत झालेल्या कराराप्रमाणे चालविणेसाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार सदरील शौचालय 30 वर्षाच्या भाडे करारावर रू.4000/- प्रति वर्ष प्रमाणे श्री. रामप्रवेश विद्यार्थी सुगम सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन यांना प्रस्तावात नमूद अटी-शर्तीनुसार देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.325 :</u>**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिडको कार्यक्षेत्रातील जाहीरात फलक उभारणीकरीता जा.क्र.मनपा/मामअ/166/2007 दिनांक 14-2-2007 नुसार स्थानिक वर्तमानपत्रात

प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार दिनांक 28-2-2007 रोजी दुपारी 3.00 वाजता खालील एजन्सीच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | |
|---|---|
| 1) सागर ॲड, औरंगाबाद | 07 ठिकाणी |
| 2) उपेंद्र पब्लिसिटी, औरंगाबाद | 07 ठिकाणी |
| 3) प्रकाश ॲड, औरंगाबाद | 07 ठिकाणी |
| 4) ड्रिम्स क्रिएशन, औरंगाबाद | 05 ठिकाणी |
| 5) आर्ट केअर, औरंगाबाद | 39 ठिकाणी |
| 6) ध्रुव ॲड, औरंगाबाद | 07 ठिकाणी |
| 7) सेतु मेडिया, औरंगाबाद | 06 ठिकाणी |
| 8) अपलिंक सर्व्हीसेस, औरंगाबाद | 03 ठिकाणी |
| **एकूण-** | **81 ठिकाणी** |

प्राप्त निविदांचे एजन्सींची 94 जाहिरात जागांसाठी काढण्यात आलेल्या निविदा जागांपैकी प्रत्येकाने वेगवेगळ्या ठिकाणच्या एकूण 81 जाहीरात फलकांसाठी जास्तीचे दर भरले असून उर्वरीत 13 जागांसाठी निविदा प्राप्त झालेली नाही. प्राप्त निविदा नुसार निविदा रक्कमेपेक्षा जास्तीचे दर दिलेल्या जागांच्या यादीसह एजन्सीचे नांवासह तक्ता सोबत जोडला आहे. कृपया अवलोकन व्हावे. एकूण 81 जाहीरातीसाठी Basic Rate नुसार महानगरपालिकेस रू.14,59,756/- एवढी रक्कम अपेक्षित होती. वरील एजन्सीने भरलेल्या रक्कमेनुसार महानगरपालिकेस रू.15,76,866/- एवढी रक्कम प्राप्त होणार आहे.

करीता यादी मध्ये ज्या एजन्सी धारकाने जास्त दर भरले आहेत त्यांना निविदेतील अट क्र. 7 नुसार करार फक्त दोन वर्षाकरीता राहील. एक वर्षानंतर नुतनीकरण करावयाचे असल्यास निविदा दरामध्ये 10% वाढ करून नुतनीकरण करण्यात येईल. करीता सिडको कार्यक्षेत्रात जाहीरात फलक (होर्डीग्ज) वरील एजन्सींना उभारण्याचे परवानगीचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको कार्यक्षेत्रातील जाहीरात फलक उभारणीकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी निविदा रक्कमेपेक्षा जास्तीचे दर दिलेल्या खालील दर्शविल्याप्रमाणे एजन्सीला जाहीरात फलक उभारणेस परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| 1) सागर ॲड, औरंगाबाद | 07 ठिकाणी |
| 2) उपेंद्र पब्लिसिटी, औरंगाबाद | 07 ठिकाणी |
| 3) प्रकाश ॲड, औरंगाबाद | 07 ठिकाणी |
| 4) ड्रिम्स क्रिएशन, औरंगाबाद | 05 ठिकाणी |
| 5) आर्ट केअर, औरंगाबाद | 39 ठिकाणी |
| 6) ध्रुव ॲड, औरंगाबाद | 07 ठिकाणी |
| 7) सेतु मेडिया, औरंगाबाद | 06 ठिकाणी |
| 8) अपलिंक सर्व्हीसेस, औरंगाबाद | 03 ठिकाणी |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.326 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतनीकरणाच्या कामा अंतर्गत इमारतीच्या दर्शनी भागास म्युरल लावणे बाबतचा प्रस्ताव दिनांक 24.11.2006 रोजी स्थायी समिती बैठकी समोर सादर करण्यात आलेला होता. सदरील प्रस्तावास स्थायी समितीने ठराव क्र.170 अन्वये मान्यता दिलेली होती. दिनांक 16.12.2006 रोजीच्या बैठकीत विषय क्र.175 अन्वये दि.24-11-2006 चे इतिवृत्त कायम करण्यात आले. तथापी दि.24.1.2007 रोजी विषय क्र.212 अन्वये दि.16.12.2006 रोजीचे

इतिवृत्त कायम करणे या विषया अंतर्गत सदरील प्रस्ताव पुनःश्च पुढील बैठकीत सादर करणे बाबत स्थायी समितीने आदेश दिलेले होते.

त्यानुसार पुनःश्च प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतनीकरणाच्या कामांतर्गत प्रसिध्द रंगकर्मी(कलावंत) श्री.प्रशांत दामले, मा.सभापती(स्थायी समिती) तथा या भागाचे स.नगरसेवक श्री.रेणुकादास वैद्य व मा.आयुक्त यांचे सूचनांप्रमाणे नाट्यगृहाच्या मुख्य फोयर मध्ये भिंतीवर बालगंधर्व यांचे पुरूष व स्त्री वेषातील 4'x7'या आकाराची दोन तैलचित्रे आणि एक भारतीय नाट्यशास्त्राचे प्रतिक असलेल्या चित्राचे म्युरल लावण्याचे ठरले. त्यानुसार मा.सभापती(स्थायी समिती) यांचे सुचनेनुसार कामास सुरूवातही करण्यात आली आहे. या कामासाठी श्री.नरेंद्रसिंग साळुंके यांचेकडून दरपत्रक घेतले असता त्यांनी रूपये 1,69,000/- चे दरपत्रक सादर केले. श्री.साळुंके यांचे सोबत दराच्या वाटाघाटी केल्या असता त्यांनी रूपये 1,40,000/- मध्ये काम करून देण्यास संमती दिली आहे. सदरील दर हे बाजारातील प्रचलीत दरापेक्षा सुमारे 12 ते 15% कमी आहेत. मा.आयुक्त महोदय यांनी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करणे बाबत शिफारस केली आहे.

त्यानुसार चित्रकार श्री.नरेंद्रसिंग सोळुंके यांचेकडून उक्त काम करून घेण्यास व रूपये 1,40,000/- चे खर्चास मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतनीकरणाच्या कामांतर्गत नाट्यगृहाच्या मुख्य फोयर मध्ये भिंतीवर बालगंधर्व यांचे पुरूष व स्त्री वेषातील 4'x7'या आकाराची दोन तैलचित्रे आणि एक भारतीय नाट्यशास्त्राचे प्रतिक असलेल्या चित्राचे म्युरल लावण्याचे काम श्री.नरेंद्रसिंग सोळुंके यांचेकडून करून घेण्यात आलेल्या कामास व सदर कामासाठी लागणाऱ्या रक्कम रूपये 1,40,000/-चे खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.327 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, शहरातील मंगल केंद्र, हॉटेल्स, रेस्टॉरन्टस् मधून निघणारा कचरा हा विघटनशील व 24 तासाच्या आत कुजणारा कचरा(बायो डिग्रेबल) असतो. त्यामुळे तो दररोज उचलला जाण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा सुरू करून खाजगी कंत्राटदारामार्फत हा कचरा गोळा करणे व मनपाने नेमून दिलेल्या जागेवर नेऊन टाकणे यासाठी महानगरपालिका प्रत्येक मंगल कार्यालय, हॉटेल्स, रेस्टॉरन्टस् यांना खालील प्रमाणे दर आकारणे बाबत दि.26-7-2006 (का.प.क्र.8) रोजी स्थायी समिती सभा ठराव क्र.58 अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

1. **मंगल केंद्र**
   1. 1000 चौ.फुट क्षेत्रफळा पर्यंत - रू.1000/- प्रति महिना
   2. 1000 ते 3000 चौ.फुट क्षेत्रफळा पर्यंत - रू.2000/- प्रति महिना
   3. 3000 चौ.फुट क्षेत्रफळ व त्यापेक्षा जास्त - रू.4000/- प्रति महिना
2. **हॉटेल्स/रेस्टॉरन्टस्**
   1. 10 टेबल पर्यंत - रू. 100/- प्रति महिना
   2. 11 ते 25 टेबल पर्यंत - रू. 300/- प्रति महिना
   3. 25 टेबल पेक्षा अधिक - रू. 500/- प्रति महिना
   4. 3 स्टार हॉटेल्स - रू.3000/- प्रति महिना
   5. 4 स्टार हॉटेल्स - रू.4000/- प्रति महिना
   6. 5 स्टार हॉटेल्स - रू.5000/- प्रति महिना

त्या अनुषंगाने निविदा मागविण्यात आल्या असता निविदा स्विकृतीच्या अंतिम दि.19-8-2006 रोजी फक्त एकच निविदा प्राप्त झाली व ती निविदेतील अटीनुसार टक्केवारीमध्ये नसल्याने या कामाकरीता

पुन्हा निविदा मागविण्यात आल्या. निविदा स्विकृतीच्या शवटचा दि.7-2-2007 रोजी एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. त्यांचे देकार दर खालील प्रमाणे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | देकार दर (%) टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | मोना लेबर सप्लायर्स | 32.34% |
| 2 | मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस् | 25% |
| 3 | मे. परफेक्ट हाऊस किपींग | 12% |
| 4 | आदर्श सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था | निविदा उघडण्यात आली नाही. |

प्राप्त निविदापैकी सर्वात जास्त देकार दर असलेली 32.34% दराची निविदा मोना लेबर सप्लायर्स यांची असून त्यांना दि.15-3-2007 रोजी मा.आयुक्तांनी वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी 32.34% दराऐवजी 36% दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे. वरील दराने मिळणाऱ्या उत्पन्नाच्या 36% रक्कम महानगरपालिकेस मिळणार असल्याने मोना लेबर सप्लायर्स यांची निविदा स्विकारणेच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील मंगल केंद्र, हॉटेल्स, रेस्टॉरन्टस् मधून निघणारा कचरा दररोज उचलला जाण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा सुरू करून खाजगी कंत्राटदारामार्फत हा कचरा गोळा करणे व मनपाने नेमून दिलेल्या जागेवर नेऊन टाकणे यासाठी महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसार आकारणी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात जास्त देकार दर असलेले निविदाधारक मोना लेबर सप्लायर्स यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून प्रस्तावात नमूद दराने मिळणाऱ्या उत्पन्नाच्या 36% रक्कम महानगरपालिकेस देण्याच्या अटीनुसार करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.328 :**

उप आयुक्त (महसूल) प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेचे विविध ठिकाणी असलेले महानगरपालिकेच्या मालकीची मो. उस्मानपुरा येथील जागा लिजवर देणे बाबतचे दराबाबत खालील प्रमाणे मान्यता देणे आवश्यक आहे.

शिशु विकास मंदिर महिला मंडळ, उस्मानपुरा, आरक्षण क्र.106 :

शिशु विकास मंदिर महिला मंडळ, औरंगाबाद या संस्थेस उस्मानपुरा येथील आरक्षण क्र.106 मधील क्षेत्र 4046 चौ.मी. जागा शाळेला भाडेपट्ट्यावर दिलेली आहे. दिनांक 22-11-2005 रोजी अर्जदार श्रीमती शालीनी देशपांडे, अध्यक्ष, महिला मंडळ, औरंगाबाद यांनी अर्ज देऊन कळविले की, महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडून भाडेपट्ट्यापोटी करारावर आरक्षण क्र.106 क्षेत्र 4046 चौ.मी. जागेचे प्रतिवर्ष भाडे रू.27,450/- निश्चित केले आहे. करारपत्रात दर तीन वर्षांनी नुतनीकरण करण्यात येईल असे कलम आहे. त्यात 15% वाढ करण्यात येईल असा उल्लेख नाही. तरीही दर तीन वर्षांनी रू.3000/- ची वाढ करण्यात येऊन व आम्ही निमुटपणे रू.31,600/- होईपर्यंत व नंतर आजपर्यंत भरत आलो आहोत. तरी आमच्या संस्थेस इतकी भाडेवाढ आम्ही भरू शकत नाही. तरी रद्द करावी अशी विनंती केली आहे.

मा.स्थायी समिती सभा विषय क्र.185 दि.13-1-2005 नुसार सदरील संस्थेस प्रति वर्ष भाडे रू.31,600/- चा निर्णय घेतलेला आहे. करारनाम्यातील अट क्र.4 नुसार भाडेवाढ करणेचा अधिकार महानगरपालिकेस आहे. त्या अधिकारानुसार प्रतिवर्ष रक्कम रू.48,060/- दिनांक 1-8-2005 पासुन भाडेवाढ करणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. सभापती : स्थायी समिती सभा ठराव क्र.185 दि.13-1-2005 नुसार सदरील संस्थेस प्रति वर्ष भाडे रू.31,600/- भाडे आकारणीचा निर्णय घेतल्यानुसार या संस्थेस प्रति वर्ष रू.31,600/- प्रमाणे भाडे आकारणी करण्यात यावी. त्यात कुठल्याही प्रकारची भाडेवाढ करू नये.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिशु विकास मंदिर महिला मंडळ, औरंगाबाद या संस्थेस उस्मानपुरा येथील आरक्षण क्र.106 मधील क्षेत्र 4046 चौ.मी.शाळेला भाडेपट्ट्यावर दिलेल्या जागेसाठी कुठल्याही प्रकारची भाडेवाढ न करता, स्थायी समिती सभा ठराव क्र.185 दि.13-1-2005 नुसार सदरील संस्थेस प्रति वर्ष भाडे रू.31,600/- भाडे आकारणीचा निर्णय घेतल्यानुसार या संस्थेस प्रति वर्ष रू.31,600/- प्रमाणे भाडे आकारणी करण्यात यावी. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.329 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.67 येथे मो.बौध्दनगर परिसर तसेच पंचशीलनगर येथे दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत 225, 250 मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.28,61,800/- ला सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.516 दि.13-10-2006 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. निविदा सूचना क्र.90/07 दि.20-1-2007 अन्वये या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 9 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 6 निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1. एस.बी.कन्स्ट्रक्शन | 29.99% कमी दराने |
| 2. उदय इंजिनिअरींग वर्क्स | 24.09% कमी दराने |
| 3. अनिकेत कन्स्ट्रक्शन | 19.30% कमी दराने |
| 4. शहा कन्स्ट्रक्शन | 16.90% कमी दराने |
| 5. अमोल कन्स्ट्रक्शन | 16.867% कमी दराने |
| 6. ललित डी. अधाने | 11.11% कमी दराने |

उपरोक्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 29.99% कमी दराची श्री.एस.बी.कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. त्यास स्थायी समिती समोर सादर करणेस्तव मा.आयुक्तांनी दिनांक 9-3-2007 रोजी शिफारस केलेली आहे.

करीता सदरील कामासाठी उपरोक्त नुसार अं.प.दरापेक्षा 29.99% कमी दराची एस.बी.कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : ३० टक्के कमी दराने निविदा आलेली आहे. कामाचा दर्ज चांगला राहणार नाही. फेरनिविदा मागवाव्यात.

मा. सभापती : सदरील कामासाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात.

**ठराव :**

सभागृहातील चर्चेनुसार सदरील कामासाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.330 :**

औरंगाबाद शहर हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे शहन असून जगभरातून पर्यटक वेरूळ, अजिंठा, पानचक्की, औरंगाबाद लेणीसह स्थानिक पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी येत असतात. मराठवाड्याचे प्रमुख शहर असल्यामुळे पर्यटना व्यतिरिक्त शासकीय कामकाज, व्यापार उदीम व अन्य व्यावसायिक तसेच ग्राहक

औरंगाबाद शहरास भेटी देत असतात. शैक्षणिक महत्वाच्या दृष्टीने विद्यापीठ व अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालये, विधी महाविद्यालये इत्यादीत शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी शहरात येत असतात. शहरालगत असलेल्या खेड्यांमधील व औद्योगिक वसाहतीतील नागरीक नित्य कामकाजासाठी शहरात येत असतात. शहरात फिरतांना महानगरपालिकेतर्फेउभारण्यात आलेली सार्वजनिक स्वच्छतागृहांची (सार्वजनिक मुताऱ्या व शौचालये) संख्या अत्यंत तोकडी असल्याबद्दल व त्यांची आजची स्थिती असमाधानकारक असल्याबद्दल नागरीकांच्या प्रतिक्रिया विविध वर्तमानपत्रे व व्यासपीठांवरून उमटत असतात.

सन 2005-06 मध्ये संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान अंतर्गत तिसऱ्या फेरीच्या तपासणीसाठी आलेल्या पथकानेही शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या पुरेशी नसल्यामुळे नाराजी व्यक्त केली होती. वरील सर्व परिस्थिती पाहता शहरामध्ये सुलभ सुविधा केंद्रांची उभारणी करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहरात सर्व सोयींनी युक्त असलेले सुविधा केंद्र उभारण्या संदर्भाने सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेनी औरंगाबाद शहराचे सर्वेक्षण करून एकुण विविध 35 ठिकाणी सुलभ सुविधा केंद्र उभारण्याबाबत व **पैसे द्या व वापरा** या तत्वावर पुढे चालविण्यास तयार असल्याचे कळविले आहे. सदर संस्थेमार्फत महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपालिका, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसर, बृहन्मुंबईतील गलिच्छ वस्ती सुलभ सुविधा केंद्रांची उभारणी केली आहे. तसेच ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण भागात सामुहिक स्वच्छता गृहांची उभारणी केली आहे. तसेच इतर राज्यातही सुलभ शौचालये केंद्रांची उभारणी केली आहे.

सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई चे मार्फत सुलभ सुविधा केंद्र (सुलभ शौचालय, मुतारी व स्नानगृह संकुल) उभारणी संदर्भाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे मार्गदर्शक तत्व दिनांक 1 जुन 2004 अन्वये प्रसिध्द झालेले आहे. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नीत रूग्णालया अंतर्गत सुलभ शौचालय व स्नानगृह सुविधा उपलब्ध करून देणे बाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एम.आय.एस.-2003/प्र.क्र./99/प्रशा-2, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय मुंबई, दिनांक 19 सप्टेंबर 2003 अन्वये मार्गदर्शक तत्वे प्रसिध्दी झालेली आहेत. बृहन्मुंबईतील गलिच्छ वस्तीत प्रायोगीक तत्वावर सुलभ शौचालय बांधणे बाबत महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन शुध्दीपत्रक क्रमांक गवस 1088/सी.आर.-2018/शास-2/का-7 मंत्रालय मुंबई, दिनांक 23-2-1989 अन्वये मार्गदर्शक तत्वे नमूद केली आहेत.

सुलभ सुविधा केंद्र (सुलभ शौचालय, मुतारी व स्नानगृह संकुल) उभारणीसाठी नकाशे व अंदाजपत्रके तयार करणे संदर्भाने शासनाने Government of Maharashtra, Revenue and Forest Department, Govt. Resolution Number LP-10-01/CR-4/F-1, Mantralaya Mumbai, Dated 07 June 2001 चे शासन निर्णयात सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थे मार्फतराबविण्यासाठीचे मार्गदर्शक तत्वे नमूद केली आहेत. महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे दिनांक 01 जुन 2004 चे पत्रानुसार सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस विना निविदा काम देण्याबाबतचे मार्गदर्शन केलेले आहे. शासनाच्या वरील मार्गदर्शक तत्वाआधारे औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत निविदा न मागविता शहरात 20 ठिकाणी सुलभ सुविधागृह (सुलभ शौचालय, मुतारी व स्नानगृह संकुल) उभारणी करणे व पैसे द्या व वापरा या तत्वावर सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस चालविण्यास देणे हे काम करता येईल. त्यासाठी आवश्यकतेनुसार शासनाकडून परवानगी घेण्यात येईल. पुढील अटी व शर्ती आधारे सदरील सुलभ सुविधा केंद्राची उभारणी करण्यात येईल.

1. सुलभ सुविधा केंद्रासाठी (शौचालय, मुतारी व स्नानगृह संकुलासाठी) आवश्यक तितकी अथवा उपलब्ध मोकळी जागा महानगरपालिकेमार्फत निश्चित करून सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस बांधकामासेठी देण्यात येईल. मात्र या जागेची मालकी महानगरपालिकेचीच राहील.

2. सलभ सुविधा केंद्राच्या बांधकामा बाबत महानगरपालिकेच्या प्रचलीत धोरणानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद परिक्षेत्राचे चालू दरसूचीवर आधारीत अंदाजपत्रके व नकाशे सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेने तयार करावी व त्यास औरंगाबाद महानगरपालिकेची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घ्यावी. तद्नंतर बांधकाम सुरू करण्याबाबत महानगरपालिकेतर्फे परवानगी देण्यात येईल..
3. सुलभ सुविधा केंद्र प्रथमतः 30 वर्षे सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेने चालविणे बंधनकारक राहील. त्याच्या देखभालीसाठी लागणारी अस्थापना व त्यावर येणारा खर्च तसेच सुविधा केंद्राची देखभाल दुरूस्ती, पाणीपट्टी, वीज बील इत्यादी साठीचा खर्चही संस्थेस करावा लागेल.
4. सुलभ सुविधा केंद्रावर वीज पुरवठा व पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणेसाठी सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस स्वखर्चाने स्वतंत्र मीटर बसविणे बंधनकारक राहील.
5. सुलभ सुविधा केंद्राची (मुतारी, शौचालय व स्नानगृह संकुल) संपूर्ण स्वच्छता राखण्याची जबाबदारी सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई यांची राहील. त्यासाठी आवश्यक साहित्य उदा.फिनेल, डिटर्जेंट, झाडू इत्यादीवरील खर्च संस्थेस करावा लागेल.
6. सुलभ सुविधा केंद्रात असलेली मुतारीची सेवा मोफत राहील. शौचालयाच्या वापरासाठी प्रति व्यक्ती रूपये 2/- व स्नानगृहाच्या वापरासाठी प्रति व्यक्ती रूपये 3/- प्रमाणे शुल्क आकारणे तसेच गोरगरीब जनतेसाठी 10% सुविधा मोफत पुरविणे सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस बंधनकारक राहील. सदर दर, सदरहू सुविधा सुरू झाल्याच्या दिनांका पासून प्रथमतः पाच वर्षासाठी राहीतील व त्यानंतर स्थानिक परिस्थितीचा विचार करून आढावा घेऊन वाढीव दरांचा निर्णय घेण्यात येईल.
7. सुलभ सुविधा केंद्राच्या दर्शनी भागात जाहीरात फलक उभारणीस संस्थेस परवानगी देण्यात येईल. महानगरपालिकेने निर्धारीत केलेल्या दरानुसार सदर जाहीरात शुल्कापोटी जमा होणारे शुल्काच्या 50% रक्कम महानगरपालिकेस जमा करणे बंधनकारक राहील. सदर जाहीरात फलक उभारणीचा, सुस्थितीत राखण्याचा व त्यासाठी आवश्यक असलेली विद्युत व्यवस्था करण्याचा संपूर्ण खर्च संस्थेस करावा लागेल.
8. सुलभ सुविधा केंद्राचे बांधकाम करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करतांना त्यात प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश असेल.
   अ) स्थापत्य विषयक कामे
   ब) विद्युतीकरणाची कामे
   क) Implementation Charges (अ+ब च्या 20% वाढीव)

   एकूण अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये अ+ब+क चा समावेश असेल.
9. सुलभ सुविधा केंद्राचे प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यापुर्वी वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 35% अग्रीम रक्क्म/फिरता निधी (रिव्हाल्वींग फंड) म्हणुन सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस देण्यात येईल आणि या अग्रीमाचे समायोजन शेवटच्या बिलामधून करण्यात येईल. यासाठी नियमाप्रमाणे विहीत शुल्काच्या मुद्रांकावर हमीपत्र (Undertaking) लिहून देणे संस्थेस बंधनकारक राहील. बांधकाम सुरू करणेपुर्वी संस्थेबरोबर विहीत करारनामा करण्यात येईल.

10. सुलभ सुविधा केंद्राच्या उभारणीपोटी संस्थेस बिलाची रक्कम अदा करणेसाठी खालील प्रमाणे टप्पे ठरविण्यात येतील.

| | |
|---|---|
| अ) अग्रीम रक्कम / फिरता निधी | 35% |
| ब) जोत्याचे बांधकाम पुर्ण झाल्यावर | 15% |

| | |
|---|---|
| क) लिंटल लेव्हल पर्यंतचे काम पुर्ण झाल्यावर | 15% |
| ड) छताचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर | 20% |
| इ) सुविधा केंद्राचे उद्घाटन समारंभानंतर | 15% |
| | एकूण **-100%** |

पहिल्या टप्प्यात खालील नमूद 20 ठिकाणी सुलभ सुविधा केंद्राची उभारणी करणे प्रस्तावीत आहे.

| अ.क्र. | ठिकाण | बैठकांची संख्या | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | टी. व्ही. सेंटर चौक | 12 | 14,31,000/- |
| 2. | सार्वजनिक बांधकाम कार्यालयाजवळ, पदमपुरा | 12 | 14,31,000/- |
| 3. | सेव्हनहिल उड्डाण पुलाच्या खाली | 12 | 14,31,000/- |
| 4. | अशोकनगर शहाबाजार | 12 | 14,31,000/- |
| 5. | मध्यवर्ती जकात नाका, बायजीपुरा | 12 | 14,31,000/- |
| 6. | वार्ड कार्यालय-ड परिसर, क्रांतीचौक | 12 | 14,31,000/- |
| 7. | जाफरगेट मॉडर्न मिडल स्कूल, गांधीनगर | 12 | 14,31,000/- |
| 8. | गजानन महाराज मंदिर चौक | 12 | 11,47,000/- |
| 9. | औरंगाबाद रेल्वे स्टेशन | 07 | 11,47,000/- |
| 10. | मुकुंदवाडी पोलीस स्टेशन जवळ | 07 | 11,47,000/- |
| 11. | आंबेडकर चौक, एन-7 सिडको | 07 | 11,47,000/- |
| 12. | जिल्हा सत्र न्यायालय परिसर | 07 | 11,47,000/- |
| 13. | पैठणगेट वाहनतळ | 07 | 11,47,000/- |
| 14. | आर.टी.ओ. कार्यालयाजवळ | 07 | 11,47,000/- |
| 15. | निराला बाजार नाल्याजवळ, औरंगपुरा | 10 | 16,36,000/- |
| 16. | मिल कॉर्नर रोड नाला, नागेश्वरवाडी | 10 | 16,36,000/- |
| 17. | बारूदगरनाला जवळ, औरंगपुरा | 10 | 16,36,000/- |
| 18. | प्रतापनगर नाला, चौसरनगर | 10 | 16,36,000/- |
| 19. | घाटी हॉस्पीटल मकईगेट नाला | 10 | 11,96,000/- |
| 20. | नवजीवन कॉलनी भाजी मंडई | 10 | 11,96,000/- |
| | | एकूण-- | **2,72,66,000/-** |

उपरोक्त नमूद केल्यानुसार सुलभ सुविधा केंद्रांच्या उभारणीस अंदाजे एकुण रूपये 2,72,66,000/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्चास सन 2007-08 चे अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध करण्यात येत आहे. त्यासाठी दिनांक 28-2-2007 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.764 अन्वये मंजुर झालेल्या ठरावानुसार औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी सुलभ सुविधागृह (मुतारी, शौचालय व स्नानगृह संकुल) उभारणेस व **पैसे द्या व वापरा** या तत्वावर सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून चालविण्यास देऊन, पहिल्या टप्प्यात उक्त प्रमाणे नमूद 20 ठिकाणी सुलभ सुविधा केंद्राची उभारणी करणे, या कामासाठी आवश्यक रक्कम रूपये 2,72,66,000/- ची तरतूद सन 2007-08 च्या अर्थसंकल्पात करणे तसेच सदर अंदाजपत्रक रक्कम रूपये 2,72,66,000/- ला मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभा दि.28-2-2007 रोजी विषय क्र.764 नुसार मंजुर झालेला आहे.

तरी वरील प्रमाणे औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी सुलभ सुविधागृह (मुतारी, शौचालय व स्नानगृह संकुल) उभारणेस व पैसे द्या व वापरा या तत्वावर ुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रत्यक्षात उभारणी करणे व चालविण्यास देणे, या कामासाठी आवश्यक रक्कम रू.2,72,66,000/- ची तरतूद सन 2007-08 च्या अर्थसंकल्पात करणे तसेच सदर अंदाजपत्रक रक्कम रूपये 2,72,66,000/- ला मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी सुलभ सुविधागृह (मुतारी, शौचालय व स्नानगृह संकुल) उभारणेस व सुलभ सुविधा केंद्र उभारणीसाठी नकाशे व अंदाजपत्रके तयार करणे संदर्भाने शासनाने Government of Maharashtra, Revenue and Forest Department, Govt. Resolution Number LP-10-01/CR-4/F-1, Mantralaya Mumbai, Dated 07 June 2001 चे शासन निर्णयात सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थे मार्फत राबविण्यासाठीचे मार्गदर्शक तत्वानुसार, महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे दिनांक 01 जुन 2004 चे पत्रानुसार सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस विना निविदा काम देण्याबाबतचे मार्गदर्शन केलेले आहे. त्यानुसार **पैसे द्या व वापरा** या तत्वावर सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून चालविण्यास देऊन, पहिल्या टप्प्यात उक्त प्रमाणे नमूद 20 ठिकाणी सुलभ सुविधा केंद्राची उभारणी करणे, या कामासाठी आवश्यक रक्कम रूपये 2,72,66,000/- ची तरतूद सन 2007-08 च्या अर्थसंकल्पात करण्यास तसेच सुलभ सुविधा केंद्राच्या उभारणीपोटी संस्थेस बीलाची रक्कम खालील दर्शविल्यानुसार अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| अ) अग्रीम रक्कम / फिरता निधी | 35% |
| ब) जोत्याचे बांधकाम पुर्ण झाल्यावर | 15% |
| क) लिंटल लेव्हल पर्यंतचे काम पुर्ण झाल्यावर | 15% |
| ड) छताचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर | 20% |
| इ) सुविधा केंद्राचे उद्घाटन समारंभानंतर | 15% |
| | एकूण **-100**% |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.331 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील एन-2, एन-3, एन-4 व शिवाजीनगर इत्यादी विभागाकरीता कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने पथदिवे देखभाल दुरूस्ती मे. सोनु इलेक्ट्रीकल, नागपुर यांचेकडून करून घेण्यात येत आहे. सदर कामाची मुदत दिनांक 31-3-2007 रोजी संपत आहे.

सन 2007-08 नवीन वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करून निविदा कार्यवाही करण्यास वेळ लागणार आहे. करीता उक्त विभागात मे. सोनु इलेक्ट्रीकल यांचेकडून त्यांचे मंजुर दरानुसार माहे ऑगष्ट 2007 पर्यंत वाढीव खर्चासह म्हणजेच रक्कम रूपये 6,81,010/- चे मंजुरीसह काम करून घेण्यास मा.आयुक्तांनी दि.20-3-2007 अन्वये मान्यता दिली आहे.

करीता मे. सोनु इलेक्ट्रीकल, नागपुर यांचेकडून माहे एप्रिल 2007 ते ऑगष्ट 2007 या पाच महिन्याकरीता त्यांच्या मंजुर दरानुसार काम करून घेण्याच्या मुदतवाढीव व रक्कम रूपये 6,18,010/- च्या वाढीव खर्चास मान्यता प्राप्त होणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मुजेब खान : विषय क्र ३३१ ते ३३३ हे तीन ही विषय सारखेच आहे. २२ लक्षचे काम तीन महिण्यासाठी एजन्सीला देत आहोत.विद्युत विभाग तीन महिणे काम करू शकत नाही. का उशीर झाला, प्रशासनाची जबाबदारी होती.

कार्य.अभियंता(विद्यु.) : शहर आणि सिडको मिळून ११ अधिक ३ असे एकूण १४ टेंडर काढले होते. ११ टेंडरची मुदत ऑगस्ट २००७ मध्ये संपणार आहे. ३ ची मुदत ३१ मार्च २००७ ला संपणार आहे. शहरामधील जेवढे कॉम्प्रेसीव्ह मेन्टेनन्स त्यामध्ये वॅट १२.५० टक्के द्यावे लागत होते. शहरात पहिल्यादांच हे केले आहे. याचे व्यतिरिक्त यांनी हे मान्य केलेले आहे.या महापालिकेला फायदा आहे. १२.५० टक्के वाचतात. तसेच ऑगस्ट मध्ये १४ टेंडर पून्हा एकत्रित काढता येईल.

श्री.मुजेब खान : महानगरपालिकेला कोणताही फायदा नाही. शहरात १०० पैकी किमान ५० लाईट एका वेळी बंद दिसून येतील. हिनानगर गणेश कॉल्नी, मूजेब नगर रोषण गेटच्या बाहेरी भाग तसेच बारी कॉलनी तसेच कैसरकॉनी भागात ही ५० टक्के लाईट बंद आहे. एजन्सीला काहीही माहिती नसते. त्यांना कूणी विचारत नाही. प्रशासनास सांगावे लागते. प्रशासन एजन्सीला सांगते. ३ महिन्यात २२ लक्ष देणे बरोबर नाही.

मा. आयुक्त : १ एप्रिल पासून सिडकोचे हस्तांतर केले होते तेंव्हापासून ते ३१ मार्च २००७ पर्यत हा ठेका दिला होता. सिडकोकडे होते तेंव्हाही खाजगी एजन्सीकडेच होते महापालिकेकडे आल्यानंतर खाजगी एजन्सीला तीन वेगवेगळया भागासाठी काम दिले होते. सिडकोचा अनुभव बघून शहरातील ११ टेंडर काढून ११ एजन्सीला काम दिलेले आहे.ऑगस्ट मध्ये त्यांची मूदत संपत आहे. म्हणून या एजन्सीला तीन चार महिण्याची मूदत देवून त्यानंतर १४ टेंडर न काढता एकूण चार पाच एजन्सीला ठेका देवून काम करून घेवू असा प्रशासनाचा मानस आहे. शहरात जे दर आहे त्यापेक्षा रेट कमी आहे म्हणून प्रपोजकेलेले आहे.

श्री.मुजेब खान : ज्यांना ठेका दिला होता त्यांना किती दिवस अशी कामे देत राहणार आहे.

मा. आयुक्त : सिडको भागात ५००० लाईट बीओटीवर लावायचे आहे. ते कूठे लावयाचे म्हणून या टेंडरमध्ये कमी करावे लागतील. सर्वसाधारण सभेने मान्यता दिली परंतू इतिवृत्त कायम झाले नव्हते. शहरातील ५ हजर तसेच सिडकोतील ५ हजर असे १० हजर पोलचे बीओटीवर देवून उर्वरीत १५ हजर पोलसाठी ऑगस्ट महिण्यात टेंडर काढून कार्यवाही करता येईल.

श्री.मुजेब खान : संबधीत एजन्सीचा करारनामा संपलेला आहे. पूढील तीन महिण्यासाठी प्रशासन हे काम करू शकत नाही का?

मा. आयुक्त : यात फिटींग, वाहन तसेच कर्मचाऱ्यांचा खर्च करावा लागणार आहे.

श्री.मुजेब खान : ऐनवेळी असे प्रस्ताव समोर ठेवून मंजूरी देणे चूकीचे वाटते.अनेक ठेकेदार अधिकाऱ्याचे बांधलेले आहे.

मा. सभापती : ३१मार्च पूर्वी टेंडरची मुदत संपत होती तर अगोदरच कार्यवाही केली नाही स. सदस्यांची भावना रास्त आहे. यापूढे काळजी घेण्यात यावी. हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील एन-2, एन-3, एन-4 व शिवाजीनगर इत्यादी विभागाकरीता कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने पथदिवे देखभाल दुरूस्तीचे काम मे. सोनु इलेक्ट्रीकल, नागपुर यांचेकडून माहे एप्रिल 2007 ते ऑगष्ट 2007 या पाच महिन्याकरीता त्यांच्या मंजुर दरानुसार करून घेण्याच्या मुदतवाढीस व रक्कम रूपये 6,18,010/- च्या वाढीव खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.332 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील एन-9, ते एन-13 इत्यादी विभागाकरीता कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने पथदिवे देखभाल दुरूस्ती मे. सोनु इलेक्ट्रीकल, नागपुर यांचेकडून करून घेण्यात येत आहे. सदर कामाची मुदत दिनांक 31-3-2007 रोजी संपत आहे.

सन 2007-08 नवीन वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करून निविदा कार्यवाही करण्यास वेळ लागणार आहे. करीता उक्त विभागात मे. सोनु इलेक्ट्रीकल यांचेकडून त्यांचे मंजुर दरानुसार माहे ऑगष्ट 2007 पर्यंत वाढीव खर्चासह म्हणजेच रक्कम रूपये 7,41,015/- चे मंजुरीसह काम करून घेण्यास मा.आयुक्तांनी दि.20-3-2007 अन्वये मान्यता दिली आहे.

करीता मे. सोनु इलेक्ट्रीकल, नागपुर यांचेकडून माहे एप्रिल 2007 ते ऑगष्ट 2007 या पाच महिन्याकरीता त्यांच्या मंजुर दरानुसार काम करून घेण्याच्या मुदतवाढीव व रक्कम रूपये 7,41,015/- च्या वाढीव खर्चास मान्यता प्राप्त होणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :.**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील एन-9, ते एन-13 इत्यादी विभागाकरीता कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने पथदिवे देखभाल दुरूस्तीचे काम मे. सोनु इलेक्ट्रीकल, नागपुर यांचेकडून माहे एप्रिल 2007 ते ऑगष्ट 2007 या पाच महिन्याकरीता त्यांच्या मंजुर दरानुसार करून घेण्याच्या मुदतवाढीस व रक्कम रूपये 7,41,015/- च्या वाढीव खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.333 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील एन-5, एन-6, एन-7, एन-8 इत्यादी विभागाकरीता कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने पथदिवे देखभाल दुरूस्ती मे. सोनु इलेक्ट्रीकल, नागपुर यांचेकडून करून घेण्यात येत आहे. सदर कामाची मुदत दिनांक 31-3-2007 रोजी संपत आहे.

सन 2007-08 नवीन वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करून निविदा कार्यवाही करण्यास वेळ लागणार आहे. करीता उक्त विभागात मे. सोनु इलेक्ट्रीकल यांचेकडून त्यांचे मंजुर दरानुसार माहे ऑगष्ट 2007 पर्यंत वाढीव खर्चासह म्हणजेच रक्कम रूपये 8,44,165/- चे मंजुरीसह काम करून घेण्यास मा.आयुक्तांनी दि.20-3-2007 अन्वये मान्यता दिली आहे.

करीता मे. सोनु इलेक्ट्रीकल, नागपुर यांचेकडून माहे एप्रिल 2007 ते ऑगष्ट 2007 या पाच महिन्याकरीता त्यांच्या मंजुर दरानुसार काम करून घेण्याच्या मुदतवाढीव व रक्कम रूपये 8,44,165/- च्या वाढीव खर्चास मान्यता प्राप्त होणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील सिडको विभागातील एन-5, एन-6, एन-7, एन-8 इत्यादी विभागाकरीता कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने पथदिवे देखभाल दुरूस्तीचे काम मे. सोनु इलेक्ट्रीकल, नागपुर यांचेकडून माहे एप्रिल 2007 ते ऑगष्ट 2007 या पाच महिन्याकरीता त्यांच्या मंजुर दरानुसार करून घेण्याच्या मुदतवाढीस व रक्कम रूपये 8,44,165/- च्या वाढीव खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.334 :**

कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा) मनपा प्रस्ताव सादर करीत आहेत की, एन-8 सिडको या ठिकाणी 15 लाख लिटर्स क्षमतेचे जलकुंभ बांधण्याचे कामासाठी एम.जे.पी. विभागाच्या सन 2005-06 दरसुचीनुसार रक्कम रू.40,22,100/- चे अंदाजपत्रकास मान्यतेनंतर निविदा मागविल्या असता सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा 12.99% कमी दराची मे.रूद्राणी कन्स्ट्रक्शन यांचे निविदेस स्थायी समिती ठराव क्र.235 दि.23-2-2006 अन्वये मान्यता झालेली आहे. या कामासाठी 2006-07 या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा भांडवली कामे या लेखा शिर्षकात स्पील ओव्हर र.रू.40.25 लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. कामास सुरूवात करतांना कामाचे तपासणी करून घेताना शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांचेकडून जागेवर येऊन प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर त्यांचेकडील पत्र क्र.755/2086 दि.10-11-2006 अन्वये शासकीय अभियांत्रिकी यांनी पत्रामध्ये सुचविलेल्या बाबीचे काम करणे आवश्यक असल्याबाबत सुचविल्यानुसार सदर बाबीचा अंदाजपत्रकामध्ये अंतर्भाव नसल्यामुळे सदर बाबीचे अंदाजपत्रक रक्कम रू.7,02,600/- चे तयार करण्यात आलेले आहे.

तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची दि.26.2.2007 नुसार अतिरिक्त बाबीचे अंदाजपत्रक र.रू.7,02,600/- यास मंजुरी झालेली आहे. करीता सदर अतिरिक्त बाबीचे अंदाजपत्रक रक्कम रू.7,02,600/- चे काम संबंधीत गुत्तेदार मे.रूद्राणी कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प. दराने करून घेण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-8 सिडको या ठिकाणी 15 लाख लिटर्स क्षमतेचे जलकुंभ बांधण्याचे कामाअंतर्गत अतिरिक्त बाबीचे अंदाजपत्रक र.रू.7,02,600/- तसेच सदरील काम संबंधीत गुत्तेदार मे.रूद्राणी कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प. दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.335 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन-8 येथे बोटॅनिकल उद्यान विकसीत करणे करीता सा.बां.विभागाचे सन 2005-06 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू. 215.00 लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.सर्वसाधारण सभेने दिनांक 17/8/2006 रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/89/07 दिनांक 18-1-2007 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 8 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक 23-2-2007 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | मे. एलोरा कन्स्ट्रकशन | अं.प.दरापेक्षा 32% जास्त दराने |
| 2 | व्ही. आर. घुगे | अं.प.दरापेक्षा 38% जास्तदराने |
| 3 | अन्सारी कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा 40% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 32% जास्त दराची निविदा मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. तथापी मा.आयुक्तांच्या दालनात दि.5-3-2007 रोजी दराबाबतच्या झालेल्या वाटाघाटीअंती 32% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% कमी दराने मा.आयुक्तांनी, मा.स्थायी समिती समोर सादर करण्यास शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% कमी दराची निविदा स्विकारणेसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-8 येथे बोटॅनिकल उद्यान विकसीत करणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.336 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मोहल्ला झांबड इस्टेट श्रेयनगर भागातील स्व. मीनाताई ठाकरे सभागृह, वसंतविहार हौसिंग सोसायटी या संस्थेस त्यांनी दिलेल्या पत्रानुसार सौ.साधना कानडे यांचे नांवे मा.स्थायी समितीचे दि.16-1-2007 रोजी संपन्न झालेल्या (का.प.क्र.19) चे इतिवृत्ताप्रमाणे दिनांक 20-3-2007 रोजी विषय क्र.317 नुसार सभागृहाचे भाडे प्रति माह रू.1000/- प्रमाणे भाडेतत्वावर देणे करीता अनामत रक्कम रू.12,000/- तसेच मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व विद्युत देयक संबंधीत सोसायटीस भरणा करावे लागेल व मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्देशानुसार खालील अटी शर्ती प्रमाणे देणे योग्य.

अटी शर्ती :-

1. सदर सोसायटी रजिस्टर्ड असणे आवश्यक आहे.
2. सदर सोसायटी तेथील हौसिंग सोसायटी रेखांकनामधील लोकांची असली पाहिजे.
3. सदर जागेचेदुरूस्ती व देखभाल सोसायटीनेच करावे.
4. महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातून किंवा महानगरपालिकेच्या फंडातून अशा प्रकारच्या खुली जागा/हॉल करीता खर्चाची तरतुद ठेवणार नाही.
5. सदर इमारत/जागेचा वापर सर्व नागरीकांसाठी असेल.
6. मा.स्थायी समितीच्या ठरावानुसार हॉल भाड्याने देणे बाबत कार्यवाही ही फक्त त्याच रेखांकनातील लोकांनी हौसिंग सोसायटी बनविल्यास त्यांच्यासाठीच अंमलात राहील.
7. याशिवाय महानगरपालिकेने ठरविलेले इतर अटी शर्ती सोसायटीस बंधनकारक राहील.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला झांबड इस्टेट श्रेयनगर भागातील स्व. मीनाताई ठाकरे सभागृह, वसंतविहार हौसिंग सोसायटी या संस्थेस त्यांचे पत्रानुसार सौ.साधना कानडे यांचे नांवे, सभागृहाचे भाडे प्रति माह रू.1000/- प्रमाणे भाडेतत्वावर देणे करीता अनामत रक्कम रू.12,000/- तसेच मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व विद्युत देयक संबंधीत सोसायटीस भरणा करावे लागेल या व प्रस्तावात नमूद इतर अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.337 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मोहल्ला श्रेयनगर हनुमान मंदिरा समोरील महानगरपालिकेच्या मालकीचे सभागृह श्रेयनगर उत्कर्ष मंडळ या संस्थेस मा.स्थायी समितीचे दि.16-1-2007 रोजी संपन्न झालेल्या (का.प.क्र.19) चे इतिवृत्ताप्रमाणे दिनांक 20-3-2007 रोजी विषय क्र.317 नुसार सभागृहाचे भाडे प्रति माह रू.1000/- प्रमाणे भाडेतत्वावर देणे करीता अनामत रक्कम रू.12,000/- तसेच मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व विद्युत देयक संबंधीत सोसायटीस भरणा करावे लागेल व मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्देशानुसार खालील अटी शर्ती प्रमाणे देणे योग्य.

अटी शर्ती :-

1. सदर सोसायटी रजिस्टर्ड असणे आवश्यक आहे.
2. सदर सोसायटी तेथील हौसिंग सोसायटी रेखांकनामधील लोकांची असली पाहिजे.

3. सदर जागेचेदुरूस्ती व देखभाल सोसायटीनेच करावे.
4. महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातून किंवा महानगरपालिकेच्या फंडातून अशा प्रकारच्या खुली जागा/हॉल करीता खर्चाची तरतुद ठेवणार नाही.
5. सदर इमारत/जागेचा वापर सर्व नागरीकांसाठी असेल.
6. मा.स्थायी समितीच्या ठरावानुसार हॉल भाड्याने देणे बाबत कार्यवाही ही फक्त त्याच रेखांकनातील लोकांनी हौसिंग सोसायटी बनविल्यास त्यांच्यासाठीच अंमलात राहील.
7. याशिवाय महानगरपालिकेने ठरविलेले इतर अटी शर्ती सोसायटीस बंधनकारक राहील.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला श्रेयनगर हनुमान मंदिरा समोरील महानगरपालिकेच्या मालकीचे सभागृह श्रेयनगर उत्कर्ष मंडळ या संस्थेस सभागृहाचे भाडे प्रति माह रू.1000/- प्रमाणे भाडेतत्वावर देणे करीता अनामत रक्कम रू.12,000/- तसेच मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व विद्युत देयक संबंधीत सोसायटीस भरणा करावे लागेल या व प्रस्तावात नमूद इतर अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.338 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, लक्ष्मण चावडी ते एम.जी.एम. पर्यंत 18/24 मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण/सुधारणा करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.3,13,44,120/- चे असून या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता, खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | गुरूनाननक इंडस्ट्रीज | 7.60% जास्त |
| 2 | ए. सी. कोठारी | 12% जास्त |

वरील प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा ही गुरूनाननक इंडस्ट्रीज यांची असून त्यांचा निविदा दर हा अं.प. दरापेक्षा 7.60% जास्तदराने आहे. अंदाजपत्रकाची प्रचलित दरसुचीतील दर विचारात घेवून तुलना केली असता सदर दरवाढ ही अंदाजपत्रकापेक्षा 4.22% जास्त एवढी येते.

मा.आयुक्त यांनी कंत्राटदाराबरोबर निविदा दराबाबत वाटाघाटी केल्या असता गुरूनाननक इंडस्ट्रीज यांनी अं.प.दरापेक्षा 4.22% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविलेली आहे.

तरी गुरूनाननक इंडस्ट्रीज यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.22% जास्त दराची निविदा स्विकृतीबाबत निर्णयास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लक्ष्मण चावडी ते एम.जी.एम. पर्यंत 18/24 मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण/सुधारणा करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक गुरूनाननक इंडस्ट्रीज यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.22% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.339 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, बाराभाई ताजिया ते महात्मा फुले चौकापर्यंत 18 मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण/सुधारणा करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.72,01,540/- चे असून या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता, खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | राजेंद्रसिंग डी. अजितसिंग | 7.11% जास्त |

| | | |
|---|---|---|
| 2 | के.बी. पाथ्रीकर | 10% जास्त |
| 3 | चारणीया कन्स्ट्रक्शन | 11% जास्त |
| 4 | ए. सी. कोठारी | 15% जास्त |
| 5 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 30% जास्त |

वरील प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा ही राजेंद्रसिंग डी. अजितसिंग यांची असून त्यांचा निविदा दर हा अं.प. दरापेक्षा 7.11% जास्त दराने आहे. अंदाजपत्रकाची प्रचलित दरसुचीतील दर विचारात घेवून तुलना केली असता सदर दरवाढ ही अंदाजपत्रकापेक्षा 5.17% जास्त एवढी येते.

मा.आयुक्त यांनी कंत्राटदाराबरोबर निविदा दराबाबत वाटाघाटी केल्या असता राजेंद्रसिंग डी. अजितसिंग यांनी अं.प.दरापेक्षा 5.17% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविलेली आहे.

तरी राजेंद्रसिंग डी. अजितसिंग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.17% जास्त दराची निविदा स्विकृतीबाबत निर्णयास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बाराभाई ताजिया ते महात्मा फुले चौकापर्यंत 18 मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण/सुधारणा करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमीदराचे निविदाधारक राजेंद्रसिंग डी. अजितसिंग यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.17% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.340 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, जळगांव रोड ते जटवाडा या 24 मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण/सुधारणा करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.2,85,21,132/- चे असून या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता, खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 7.68% जास्त |
| 2 | के. बी. पाथ्रीकर | 8.10% जास्त |
| 3 | पी. एम. चोरडीया | 8.69% जास्त |
| 4 | गुरूनानक इंडस्ट्रीज | 14% जास्त |
| 5 | ए. सी. कोठारी | 15.90% जास्त |
| 6 | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 25% जास्त |
| 7 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 29.50% जास्त |

वरील प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा ही ए. एस. कन्स्ट्रक्शन यांची असून त्यांचा निविदा दर हा अं.प. दरापेक्षा 7.68% जास्त दराने आहे. अंदाजपत्रकाची प्रचलित दरसुचीतील दर विचारात घेवून तुलना केली असता सदर दरवाढ ही अंदाजपत्रकापेक्षा 8.31% जास्त एवढी येते.

निविदाधारकाने दिलेले दर प्रचलित दरसुचीतीलदरापेक्षा कमी असल्याने ए. एस. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.68% जास्त दराची निविदा स्विकृतीबाबत निर्णयास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जळगांव रोड ते जटवाडा या 24 मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण/सुधारणा करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ए.एस. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.68% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.341 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, हर्सुल रोड ते ऑडीटर सोसायटी या 15 मी. रूंद विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण/सुधारणा करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.1,62,85,639/- चे असून या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता, खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | चारणीया कन्स्ट्रक्शन | 7.786% जास्त |
| 2 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 11% जास्त |
| 3 | ए. सी. कोठारी | 15% जास्त |
| 4 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 29% जास्त |

वरील प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा ही चारणीया कन्स्ट्रक्शन यांची असून त्यांचा निविदा दर हा अं.प. दरापेक्षा 7.786% जास्त दराने आहे. अंदाजपत्रकाची प्रचलित दरसुचीतील दर विचारात घेवून तुलना केली असता सदर दरवाढ ही अंदाजपत्रकापेक्षा 5.05% जास्त एवढी येते.

मा.आयुक्त यांनी कंत्राटदाराबरोबर निविदा दराबाबत वाटाघाटी केल्या असता चारणीया कन्स्ट्रक्शन यांनी अं.प.दरापेक्षा 5.05% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविलेली आहे.

तरी चारणीया कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.05% जास्त दराची निविदा स्विकृतीबाबत निर्णयास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल रोड ते ऑडीटर सोसायटी या 15 मी. रूंद विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण/सुधारणा करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक चारणीया कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.05% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.342 :**

अतिरिक्तशह अभियंता यांनी फेर प्रस्ताव सादर केलेला आहे की, रोशनगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करण्याच्या कामाची चौथ्या वेळेस फेर निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 2 निविदा पत्रके विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 2 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. सदर निविदा दि.27.2.2007 रोजी उघडण्यात आल्या असता, निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

1. मे. गायत्री आर्कीटेक्ट पी. व्यंकटेश्वरराव — 19.00% जास्त दराने
2. शेख मसुद — 23.32% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे. गायत्री आर्कीटेक्ट पी. व्यंकटेश्वरराव यांची असून ती अं.प. दरापेक्षा 19% जास्त दराने आहे. सदरील काम हे ऐतिहासिक वारसा जतन करणे संबंधी असल्यामुळे व इतर कामापेक्षा वेगळे काम आहे. सदरील काम अनुभवी व कुशल कारागीर यांचेकडून करून घ्यावे लागणार आहे. वाटाघाटी अंती सदरील काम हे 15% जास्त दराने करणेचे संबंधीत गुत्तेदाराने मान्य केलेले आहे. त्यामुळे प्रस्तावित कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम ही रू.10,94,748/- एवढी असून निविदा 15% जास्त दराची असल्याने कामावर एकूण खर्च रू.12,58,960/- होणार आहे. यास मा.आयुक्तांनी शिफारस करून स्थायी समिती सभेत प्रस्ताव सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी मे.गायत्री आर्कीटेक्ट पी.व्यंकटेश्वरराव यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 15% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मुजेब खान : यात दोन निविदा आलेल्या असून एक निविदा आंध्रां येथील व्यक्ती आहे. आध्रं प्रदेशचे रजिस्टेशन महाराष्ट्रात चालते का? संबधीत ठेकेदारानी कुठे कुठे काम केलेले आहे याचा उल्लेख नाही. यांना होवून बोलविण्यात आले असे माझे मत आहे. या ठेकेदारानी यापूर्वी रंगीन दरवाजचे काम केलेले होते. या शहरात अनेक लोक काम करण्यास तयार आहे. असे असतांना बाहेरील लोकांना काम देण्यात गरज काय? दुसऱ्या क्रमांकावर जे आहे ते चांगले काम करणारे व्यक्ती आहे. दोन वर्ष मंजूरीसाठी लागले आजप्रस्ताव समोर आला दुसऱ्या क्रमांकाचे जेठेकेदार आहे त्यांना ठेका देण्यात यावा अशी विनंती आहे. काम चांगले झाले नाही तर संबधीत अधिकारी जबाबदार राहतील यांची ही नोंद घ्यावी.व काम केंव्हा चालू होणार आहे याचाही खूलासा करावा.

अति.शहर अभियंता : आठ दिवसात कामास सुरूवात होईल.

मा. सभापती : या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. काम चांगले होईल याकडे संबधीत अधिकारी यांनी काळजी घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.गायत्री आर्कीटेक्ट पी. व्यंकटेश्वरराव यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.343 :**

कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.इ.व उ.) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्रमांक 35 मो. मिलकॉनर ते छावणी जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर 15 ते 20 वर्षापुर्वी पासून जुनी सार्वजनिक मुतारी आहे व सदरील ठिकाणी मुख्य रस्त्यालगत असलेले 60 ते 70 टपरी धारक या सार्वजनिक मुतारीचा वापर करीत होते. परंतु मनपातर्फे सदरील ठिकाणी असलेल्या टपऱ्या हटविण्यात आलेल्या आहेत व सार्वजनिक मुतारी ही अनावश्यक मोठ्या आकाराची आहे. ती तोडून रस्ता रूंदीकरण करणे करीता सोयीस्कर होईल. तसेच बाजुच्या डी.पी.च्या पश्चिमेस 2 सीटेड मुतारी बांधणे योग्य असून सदरील मुतारी तोडणे करीता अंदाजे 10 ते 15 हजार रूपये खर्च अपेक्षीत आहे.

करीता जुनी सार्वजनिक मुतारी तोडण्याच्या व नवीन 2 सीटेड मुतारी प्रस्तावित ठिकाणी बांधणेच्या कार्यवाहीसाठी स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. सभापती : विषय क्र.४३ ते ४८ या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. ऐनवेळचे जेप्रस्ताव आलेले आहे त्या सर्व प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्रमांक 35 मो. मिलकॉनर ते छावणी जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर 15 ते 20 वर्षापुर्वी पासून जुनी असलेली सार्वजनिक मुतारी तोडून नवीन 2 सीटेड मुतारी प्रस्तावित ठिकाणी बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.344 :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मौजे गारखेडा येथील सर्व्हे नंबर 51/पैकी मधील 24.00 मीटर व 15.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्राचा मोबदला मिळकतधारकांनी खाजगी वाटाघाटीने देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार प्रकरणी बाधीत क्षेत्राचा मोबदला संबंधीतास देण्याची कार्यवाही करण्यात आली असून संयुक्त मोजणी नुसार 24.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात 1822.00 चौ.मी. आणि 15.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात

बाधीत क्षेत्र 500.00 चौ.मी. अशा प्रकारे दोन्ही रस्त्यात बाधीत क्षेत्र 2322.00 चौ.मी. आहे. नियमानुसार सर्व वजावटी करून देय मोबदला रक्कम रूपये 8,95,096/- होत आहे. खरेदी खताचा खर्च 50:50% महानगरपालिका व मिळकतधारक करणार आहे. खरेदी खताचा मिळकत धारकाच्या हिश्श्यातील 50% खर्चाची वजावट करण्यात आलेली आहे. खरेदी खतासाठी एकुण खर्च रूपये 4,33,000/- एवढा अपेक्षित आहे. मुल्यांकनानुसार देय मोबदला रक्कम रूपये 8,95,096/- आणि खरेदी खताच्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. खरेदी खताच्या वेळी देय मोबदला रक्कमेच्या 10% रक्कम म्हणजेच रूपये 89,509/- देण्यात येणार असून उर्वरीत 90% रक्कम रूपये 8,05,587/- एवढी रक्कम बाधीत क्षेत्र 7/12 उतारामध्ये महानगरपालिकेचे नांवे नोंद झाल्यानंतर देण्यात येईल.

करीता वरील प्रमाणे देय मोबदला रक्कम रूपये 8,95,096/- व खरेदी खताचा खर्च रूपये 4,33,000/- या रक्कमेच्या मंजुरीस्तव भूसंपादन प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे गारखेडा येथील सर्व्हे नंबर 51/पैकी मधील 24.00 मीटर व 15.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्राचा मोबदला संबंधीतास देण्याकरीता सर्व वजावटी करून मुल्यांकनानुसार देय मोबदला रक्कम रूपये 8,95,096/-, खरेदी खताच्या वेळी देय मोबदला रक्कमेच्या 10% रक्कम म्हणजेच रूपये 89,509/- देण्यास तसेच उर्वरीत 90% रक्कम रूपये 8,05,587/- एवढी रक्कम बाधीत क्षेत्र 7/12 उतारामध्ये महानगरपालिकेचे नांवे नोंद झाल्यानंतर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.345 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या वॉर्ड-ड मधील कचरा वाहतुकीच्या कामाचे सन 2007-08 या आर्थिक वर्षासाठी खाजगीकरण करावयाचे असून सध्या वॉर्ड-ड साठी महानगरपालिकेची लहान मोठी आठ वाहने व किरायाने लावलेली तीन 1210 टिप्पर्स मिळून लेबरसह रू.83.00 लक्ष वार्षिक खर्च येतो. त्यात 10% कमी करून रू.74.70 लक्ष चे वार्षिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. खाजगीकरण केल्यास एकूण 9 टाटा 1210 टिप्पर्स किंवा त्याच क्षमतेचे इतर टिप्पर्स किरायाने दररोज 8 तास + 2 जास्तीचे तास लावण्यासाठी मंजूर दराप्रमाणे रू.84.00 लक्ष खर्च येत आहे.

आरोग्य विभागातर्फे वॉर्ड-ड चे साफसफाईचे कामासाठी तीन कंत्राटदार खालील प्रमाणे नेमलेले आहेत.

1. मोना लेबर सप्लायर्स, औरंगाबाद
2. सेंटर फॉर डेव्हलपमेंट, औरंगाबाद
3. ईश्वरलाल खरे, औरंगाबाद

दिनांक 1.4.2007 पासून सदरील वॉर्ड-ड च्या ट्रान्सपोर्टेशनचे कामाचे खाजगीकरण 1 वर्षासाठी सुरू करावयाचे असल्यामुळे सदरील काम अंदाजपत्रकीय दरात म्हणजे वार्षिक रक्कम रू.74.70 लाखात 9 टिप्पर्स व 45 लेबर्स लावून तीन पूर्वीच्या एजन्सीज प्रत्येकी तीन टिप्पर्स वाटून घेवून करण्यास तयार असतील तर त्यांचेकडून सदरील काम 2007-2008 या आर्थिक एका वर्षासाठी अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यासाठी मंजुरी मिळावी. त्यांना दररोज 10 तास टिप्पर्स चालवून 100% कचरा दररोज उचलावा लागेल व आर.टी.ओ. नियमांचे पालन करावे लागेल. वाहनास ताडपत्री लावून कचरा नारेगांव पर्यंत न्यावा लागेल. बिलावर कोणताही टॅक्स लागल्यास त्याची अदाई एजन्सीला करावी लागेल व इतर अटींचे व वाहतूक नियमांचे, लेबर ॲक्टचे पालन सदरील कंत्राटदारास करावे लागेल.

करीता 1. मोना लेबर सप्लायर्स, औरंगाबाद, 2. सेंटर फॉर डेव्हलपमेंट, औरंगाबाद, 3. ईश्वरलाल खरे, औरंगाबाद या तीन गुत्तेदाराकडून दिनांक 1.4.2007 पासून प्रत्येकी तीन तीन टिप्पर्स किरायाने प्रति वाहन 5

लेबर्स लावून काम अंदाजपत्रकीय दराप्रमाणे म्हणजेच रू.74.70 लक्ष मध्ये करून घेण्यासाठी मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या वॉर्ड-ड मधील कचरा वाहतुकीच्या कामासाठी सन 2007-08 या आर्थिक वर्षासाठी खाजगीकरणातून करावयाच्या निर्णयानुसार, आरोग्य विभागातर्फे वॉर्ड-ड चे साफसफाईचे कामासाठी नेमलेले तीन कंत्राटदार -

1. मोना लेबर सप्लायर्स, औरंगाबाद
2. सेंटर फॉर डेव्हलपमेंट, औरंगाबाद
3. ईश्वरलाल खरे, औरंगाबाद

या एजन्सीज प्रत्येकी तीन टिप्पर्स वाटून घेवून करण्याच्या अटीवर त्यांचे मार्फत दिनांक 1.4.2007 पासून सदरील वॉर्ड-ड च्या ट्रान्सपोर्टेशनचे कामाचे खाजगीकरण 1 वर्षासाठी करण्यास व सदरील काम अंदाजपत्रकीय दरात म्हणजे वार्षिक रक्कम रू.74.70 लाखात 9 टिप्पर्स व 45 लेबर्स लावून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.346 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. 2 मोहिनीराजपुरम, श्रीनिवास कन्स्ट्रक्शन कंपनी रेखांकने व रेखांकन ते मुख्य ड्रेनेज लाईन टाकणे करीता सा.बां.विभाग व एमजेपी चे सन 2005-06 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू. 24,32,000/- चे अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने दिनांक 11/1/2007 रोजी संपन्न झालेल्या बैठकीत ठराव क्र.667 अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 6 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | मे. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 0.5% कमी दराने |
| 2 | मे. शहा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 10% जास्तदराने |
| 3 | श्री. अब्दुल कदीर | अं.प.दरापेक्षा 14% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.5% कमी दराची निविदा मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. तथापी मा.आयुक्तांच्या दालनात दि.26-3-2007 रोजी दराबाबतच्या झालेल्या वाटाघाटीअंती 0.5% कमी दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% कमी दराने मा.आयुक्तांनी, मा.स्थायी समिती समोर सादर करण्यास शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी मे. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% कमी दराची निविदा स्विकारणेसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. 2 मोहिनीराजपुरम, श्रीनिवास कन्स्ट्रक्शन कंपनी रेखांकने व रेखांकन ते मुख्य ड्रेनेज लाईन टाकणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.347 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.26 गणेशनगर येथील विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षीत भिंत बांधणे व उद्यान विकसीत करणेच्या कामाकरीता सा.बां.विभागाचे सन 2005-06 च्या जिल्हा

दरसुचीनुसार रक्कम रू. 14,98,000/- चे अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानुसार उपरोक्त कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | मे. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 0.05% कमी दराने |
| 2 | काझी मुबारीजोद्यीन | अं.प.दरापेक्षा 12% जास्तदराने |
| 3 | शेख सलीम मोहीनोद्यीन | अं.प.दरापेक्षा 15% जास्त दराने |
| 4 | एस.आर.काकडे | अं.प.दरापेक्षा 10% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.05% कमी दराची निविदा मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. तथापी 0.5% कमी दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% कमी दराने मा.आयुक्तांनी, मा.स्थायी समिती समोर सादर करण्यास शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी मे. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% कमी दराची निविदा स्विकारणेसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.26 गणेशनगर येथील विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षीत भिंत बांधणे व उद्यान विकसीत करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.348 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.26 एन-8 विनायक सोसायटी येथील खुल्या जागेमध्ये जिम्नॅशीयम हॉल बांधणे व संरक्षीत भिंत बांधणेच्या कामाकरीता सा.बां.विभागाचे सन 2005-06 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू. 15,99,900/- चे अंदाजपत्रकास दि.6-2-2007 रोजी मा.स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानुसार उपरोक्त कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 9 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | हरीओम कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 5.22% जास्त दराने |
| 2 | लक्ष्मीनारायण कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 5.88% जास्तदराने |
| 3 | सत्यम कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 7% जास्त दराने |
| 4 | यु. के. पंडीत | अं.प.दरापेक्षा 7.5% जास्त दराने |
| 5 | मुबारक पठाण | अं.प.दरापेक्षा 6.5% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.22% जास्त दराची निविदा हरीओम कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. तथापी 5.22% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% जास्त दराने मा.आयुक्तांनी, मा.स्थायी समिती समोर सादर करण्यास शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी मे. हरीओम कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% जास्त दराची निविदा स्विकारणेसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.26 एन-8 विनायक सोसायटी येथील खुल्या जागेमध्ये जिम्नॅशीयम हॉल बांधणे व संरक्षीत भिंत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.हरीओम कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.349 :**

मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद व भाडे समितीच्या मंजुरीनुसार शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध ठिकाणी असलेले इमारती, जागा भाडे तत्वावर देणे बाबत व महानगरपालिकेच्या शाळेकरीता इमारती भाड्याने घेणे व ज्या भाड्याने घेतल्या होत्या त्याबाबतचे भाडे देणे बाबत.

1) मोहल्ला जयभवानीनगर वॉर्ड क्र.81 मधील श्री. बाळासाहेब नामदेव शिंदे यांच्या मालकीची इमारत शिक्षणाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी कळविल्यानुसार महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेकरीता भाडेतत्वावर दिनांक 16-6-2005 ते 27-12-2006 या कालावधी करीता घेण्यात आली होती. सदर जोगेचे चटई क्षेत्रफळ 43.10 चौ.मी., भाडे रू.156/- प्रति चौ.मी. प्रति माह याप्रमाणे एकूण रक्कम रू.1,23,363/- संबंधीतास देण्याच्या मान्यतेस्तव सादर.

2) मोहल्ला शहागंज येथील केंद्रीय प्राथमिक शाळा (म.) क्र.10 ही महावीर महिला गृह उद्योग व प्रशिक्षण केंद्र, या संस्थेकरीता भाडेतत्वावर देणे करीता सदर जागेचे चटई क्षेत्रफह 320 चौ.मी. व भाडे रक्कम रू.38/- प्रति चौ.मी. प्रति माह व अनामत रक्कम रू.600/- प्रति चौ.मी. आकारण्याच्या मान्यतेस्तव सादर.

3) मोहल्ला सिल्कमील कॉलनी, घर क्र.5-28-116/पी, सौ.बिल्कीस बेगम हबीब तांबोळी यांच्या इमारतीचा पहिला मजला ज्याचे क्षेत्रफळ 159.85 चौ.मी. महानगरपालिकेच्या शाळेकरीता भाडेतत्वावर घेण्यासाठी भाडे रक्कम रू.22/- प्रति चौ.मी. प्रति माह प्रमाणे संबंधीतास देण्याच्या मान्यतेस्तव सादर.

अ.क्र.2 करीता जागेचा मालमत्ता कर, पाणीपट्टीकर, वीज बील जो नियमाप्रमाणे येईल तो अर्जदारास भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल व सेवाशुल्क रू.5/- प्रति चौ.मी. प्रति माह भरावा लागेल व जेव्हा महानगरपालिकेस सदर जागेची आवश्यकता असेल त्यावेळेस सदर जागा महानगरपालिकेस विना अट विना मोबदला परत द्यावी लागेल. संबंधीतास महानगरपालिकेच्या प्रचलीत अटी शर्तीस अधीन राहून प्रथम पाच वर्षाकरीता भाडेतत्वावर देणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :.**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध ठिकाणी असलेले इमारती, जागा भाडे तत्वावर देणे बाबत व महानगरपालिकेच्या शाळेकरीता इमारती भाड्याने घेणे व ज्या भाड्याने घेतल्या होत्या त्याबाबतचे भाडे देणे संबंधी खालील दर्शविल्यानुसार मंजुरी देण्यात येते.

1) मोहल्ला जयभवानीनगर वॉर्ड क्र.81 मधील श्री. बाळासाहेब नामदेव शिंदे यांच्या मालकीची मनपा प्राथमिक शाळेकरीता भाडेतत्वावर दिनांक 16-6-2005 ते 27-12-2006 या कालावधी करीता घेण्यात आलेल्या इमारतीसाठी रू.156/- प्रति चौ.मी. प्रति माह याप्रमाणे एकूण रक्कम रू.1,23,363/- संबंधीतास देण्यास मंजुरी देण्यात येते.

2) मोहल्ला शहागंज येथील केंद्रीय प्राथमिक शाळा (म.) क्र.10 ही महावीर महिला गृह उद्योग व प्रशिक्षण केंद्र, या संस्थेकरीता भाडेतत्वावर देण्यासाठी रक्कम रू.38/- प्रति चौ.मी. प्रति माह व अनामत रक्कम रू.600/- प्रति चौ.मी. आकारणी करून, जागेचा मालमत्ता कर, पाणीपट्टीकर, वीज

बील जो नियमाप्रमाणे येईल तो अर्जदारास भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल व सेवाशुल्क रू.5/- प्रति चौ.मी. प्रति माह भरावा लागेल व जेव्हा महानगरपालिकेस सदर जागेची आवश्यकता असेल त्यावेळेस सदर जागा महानगरपालिकेस विना अट विना मोबदला परत द्यावी लागेल या अटीवर संबंधीतास महानगरपालिकेच्या प्रचलीत अटी शर्तीस अधीन राहून प्रथम पाच वर्षाकरीता भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

3) मोहल्ला सिल्कमील कॉलनी, घर क्र.5-28-116/पी, सौ.बिल्कीस बेगम हबीब तांबोळी यांच्या इमारतीचा पहिला मजला महानगरपालिकेच्या शाळेकरीता भाडेतत्वावर घेण्यासाठी भाडे रक्कम रू.22/- प्रति चौ.मी. प्रति माह प्रमाणे संबंधीतास देण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.350 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पडेगांव कत्तलखाना येथे बायोगॅस प्रकल्प व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे करीता र.रू.37,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.495/7 दि.13.10.2006 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा/इ-निविदा/75/06 दिनांक 20.12.2006 अन्वये Turn Key Basis अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 02 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 02 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दि.9.2.2007 रोजी उपसित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | नेहा इंटरप्राइजेस | निविदेसोबत आवश्यक कागदपत्रे सादन न केल्याने निविदा उघडण्यात आली नाही. | |
| 2. | व्हीव्हम ॲग्रोटेक | अ) प्रकल्पउभारणी - | 36.90 लक्ष |
| | | ब) कार्यान्वीत करणे- व देखभाल दुरूस्ती करणे. | 4.00 लक्ष |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच व्हीव्हम ॲग्रोटेक यांचे दर अ) प्रकल्प उभारणी 36.90 लक्ष, ब) कार्यान्वीत करणे व देखभाल दुरूस्ती करणे 4.00 लक्ष यानुसार दर प्राप्त झालेले होते. तथापी मा.आयुक्तांचे दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटीअंती अ) प्रकल्पउभारणी 31.50 लक्ष, ब) सदरील प्रकल्प 10 वर्षा पर्यंत कार्यान्वीत ठेवणे व देखभाल दुरूस्ती करणे 2.50 लक्ष (प्रति वर्ष) या दराप्रमाणे मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

त्यानुसार व्हीव्हम ॲग्रोटेक अ) प्रकल्पउभारणी 31.50 लक्ष, ब) सदरील प्रकल्प 10 वर्षा पर्यंत कार्यान्वीत ठेवणे व देखभाल दुरूस्ती करणे 2.50 लक्ष (प्रति वर्ष) या दराप्रमाणे निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव कत्तलखाना येथे बायोगॅस प्रकल्प व सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे करीता प्राप्त झालेल्या निविदाधारक व्हीव्हम ॲग्रोटेक यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार सदरील काम त्यांचेकडून अ) प्रकल्पउभारणी 31.50 लक्ष, ब) सदरील प्रकल्प 10 वर्षा पर्यंत कार्यान्वीत ठेवणे व देखभाल दुरूस्ती करणे 2.50 लक्ष (प्रति वर्ष) या दराप्रमाणे करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.351 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नागरी घनकचरा व्यवस्थापन व हातळणीच्या कामासाठी दोन जेसीबी मशीन (3 डीएक्स सुपर मॉडेल) त्वरीत खरेदी करावयाची असून त्यासाठी जेसीबीचे अधिकृत विक्रेते मे. रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद यांनी खालील प्रमाणे दरपत्रक दिले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | 1. | मुळ किंमत | 18,25,889.00 |

| | | |
|---|---|---|
| 2. | लोडींग, लॅशिंग व फॉरवर्डीग चाजेस | 2500.00 |
| 3. | एक्साईज ड्युटी 16.48% | 3,01,318.51 |
| 4. | सी.एस.टी. 12.5% | 2,66,213.44 |
| 5. | ट्रान्सपोर्ट चार्जेस | 40,000.00 |
| | | 24,35,920.95 |
| 6. | जकात 2.5% | 60,898.00 |
| | एकूण ... | **24,96,818.00** |
| ब) | जे.सी.बी. प्राप्त होताच ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडून विमा उतरवावा लागेल. त्यासाठी येणारा खर्च | 28,856.00 |
| क) | जे.सी.बी. प्राप्त झाल्यावर महाराष्ट्र एन्ट्री टॅक्स भरावा लागेल.(सेल्स टॅक्स कार्यालयामध्ये) त्यासाठी येणारा खर्च | 29,539.00 |
| | **एकूण ...** | **25,55,235.00** |

एकूण 2 जेसीबी खरेदी करण्यासाठी येणाऱ्या र.रू.51,10,470/- च्या खर्चास मंजुरी मिळावी. मे.रत्नप्रभा मोटार्स औरंगाबाद यांच्या अटीप्रमाणे पर्चेस ऑर्डर जे.सी.बी. इंडिया लि., बल्हारघाट, हरियाणा यांना द्यावी लागेल व 100% बिलाची अदाई जे.सी.बी. इंडिया लि. मुंबई या नांवे करावी लागेल. त्यास मंजुरी मिळावी. करीता 2 जेसीबी मशीन खरेदीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागरी घनकचरा व्यवस्थापन व हातळणीच्या कामासाठी दोन जेसीबी मशीन (3 डीएक्स सुपर मॉडेल) मे. रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांचे मार्फत त्वरीत खरेदी करण्यास, पर्चेस ऑर्डर जे.सी.बी. इंडिया लि., बल्हारघाट, हरियाणा या नांवाने देण्यास व 100% बिलाची अदाई जे.सी.बी. इंडिया लि. मुंबई या नांवे करण्यास आणि यासाठी लागणाऱ्या एकूण रक्कम रू.51,10,470/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.352 :**

सिडको एन-12 (सत्यविष्णु हॉस्पीटल समोर) येथील 5485 चौरस मीटर मोकळी जागा सिडको प्राधिकरणाने बसस्थानकासाठी राखीव ठेवली आहे.

ही जागा बस थांब्यासाठी खरेदी करण्याचा औरंगाबाद महानगरपालिकेचा मानस असल्यामुळे या बाबत सिडकोकडे विचारणा केली असता, सिडकोने प्रथमतः रू.1200 प्रति चौ.मी. दराने जागा देण्याबाबत लेखी कळविले होते.(पत्र जा.क्र.सिडको/प्रशा/पणन/औ.बाद/8191 दिनांक 16.11.2006) व या दरानुसार जागा खरेदी करण्यासाठी रू.65.82 लक्ष एवढा खर्च येणार होता. तद्नंतर महानगरपालिकेच्या विनंतीनुसार सिडको प्राधिकरणाने ही जागा रू.575/- प्रति चौ.मी. दराने मनपास देण्याची तयारी दर्शविली आहे. त्याप्रमाणे रू.575/- प्रति चौ.मी. दराने ही जागा खरेदीसाठी रू.31,53,875/- एवढा खर्च येणार आहे.

करीता सिडको एन-12 येथील 5485 चौ.मी. राखीव जागा सिडको कडून रू.575/- प्रति चौ.मी. दराने खरेदी करण्यासाठी येणाऱ्या रू.31,53,875/- खर्चाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-12 (सत्यविष्णु हॉस्पीटल समोर) येथील 5485 चौरस मीटर मोकळी जागा सिडको प्राधिकरणाने बसस्थानकासाठी राखीव ठेवलेली जागा सिडकोकडून रू.575/- प्रति चौ.मी. दराने खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रू.31,53,875/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.353 :**

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला खोकडपुरा येथील मिळकत न.भू.क्र.13904 मधील जागेतून महानगरपालिकेतर्फे ड्रेनेज लाईन,

जलवाहिनी आणि रस्त्याचे काम अंदाजे सन 1986 च्या दरम्यान करण्यात आलेले आहे. खाजगी मिळकती मधून वरील काम केलेले असल्याने जमीन मालकाने बाधीत जागेच्या मोबदल्याची खाजगी वाटाघाटीने मागणी केलेली आहे. प्रकरणी संयुक्त मोजणी नुसार बाधीत क्षेत्र 25.60 चौ.मी. चा मोबदला रक्कम रूपये 38,382/- होत आहे. उक्त क्षेत्राचा रितसर खरेदी खताचा खर्च 50:50% महानगरपालिकेने व मिळकतधारकाने करावयाचा आहे. खरेदी खतासाठी एकुण अंदाजे रूपये 5930/- एवढा खर्च येणार आहे. 50% खर्च अंदाजे रूपये 2965/- वरील मोबदला रक्कमेतून वजावट करून देय मोबदला रक्कम रूपये 35,417/- मिळकत धारकास देय होईल. सदरील देय रक्कमेच्या 10% म्हणजेच रक्कम रूपये 3541/- संबंधीतास खरेदी खताच्या वेळी देणे आहे व उर्वरीत 90% म्हणजे रक्कम रूपये 31,876/- ही उक्त मिळकतीचे बाधीत क्षेताची पी.आर.कार्डवर महानगरपालिकेच्या नांवाची नोंद झाल्यानंतर देण्यात येईल. देय मोबदला रक्कमेतून जाहीर प्रकटन आणि सर्च रिपोर्टचा खर्च वजा करून मोबदला रक्कम मिळकत धारकास देण्यात येईल.

तरी वरील प्रमाणे देय मोबदला रक्कम रू.35,417/- आणि खरेदी खताचा एकुण खर्च रूपये 5930/- स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला खोकडपुरा येथील मिळकत न.भू.क्र.13904 मधील जागेतून महानगरपालिकेतर्फे ड्रेनेज लाईन, जलवाहिनी आणि रस्त्याचे कामासाठी बाधीत क्षेत्र 25.60 चौ.मी. जागेच्या मोबदल्याची रक्कम रूपये 38,382/- मधून खरेदी खतासाठी लागणारा 50% खर्च अंदाजे रूपये 2965/- वरील मोबदला रक्कमेतून वजावट करून देय मोबदला रक्कम रूपये 35,417/- मिळकत धारकास अदा करण्यास व खरेदी खतासाठी लागणाऱ्या र.रू.5930/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.354 :**

(सिल्लेखाना व पडेगांव कत्तलखाना येथे खाजगी सुरक्षा व्यवस्थेसंबंधी दि.**20/3/2007** च्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव क्र.**284** सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने प्रस्तावास मान्यता द्यावी अशी उप आयुक्त(प्र.) यांनी जा.क्र.मनपा/मुपसंअ/384/2007 दि.30/3/2007 अन्वये विनंती केल्यानुसार. . . . . **प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे.)**

उप आयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला सिल्लेखाना व पडेगांव कत्तलखाना येथे 24 तासाकरीता एकूण 28 सुरक्षा रक्षक अनाधिकृत जनावरांचे कत्तल न होणे व तसेच मोहल्ल्यामध्ये कोणत्याही प्रकारचे चामडे, हाडे इत्यादी साठा करण्यात येवू नये याकरीता सदर ठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करीता जाहीर निविदा मागविण्यात आली असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **सिल्लेखाना (8 तासांकरीता) रूपये** | **पडेगांव (8 तासांकरीता) रूपये** |
|---|---|---|---|
| 01 | मे.परमवीर अ. हमीद सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था | 4212/- सेवा कर वेगळा | 4270/- सेवा कर वेगळा |
| 02 | मे. मेडीएटर्स अजिंठा सेक्युरिटी प्रा.लि. | 4443/- सेवा कर वेगळा | 4443/- सेवा कर वेगळा |
| 03 | मे. ओम साई सर्व्हीसेस | 4551/- सेवा कर वेगळा | 4551/- सेवा कर वेगळा |

वरील दरापैकी सर्वात कमी दर मे. परमवीर अ. हमीद सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था यांचे (8 तासांकरीता) दर सर्वात कमी असल्याने सदर संस्थेस चर्चेस बोलावून मा.आयुक्त यांनी दर कमी करण्यास सुचविले असता संस्थेने प्रत्येक सुरक्षा रक्षक (8 तासांकरीता) प्रतिमहा रू.4125/- मान्य केले. याशिवाय शासनाचा सेवा कर वेगळा राहील. सदर दर हे महाराष्ट्र सुरक्षा अधिनियम किमान वेतन कायद्यानुसार आहेत.

तरी सर्वात कमी दर असलेली संस्था मे. परमवीर अ. हमीद सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था यांचे दर स्थायी समितीचे मान्यतेनंतर व पुढील वर्ष 2007-2008 करीता सुरक्षा व्यवस्थेसाठी प्राप्त दर मान्यतेकरीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला सिल्लेखाना व पडेगांव कत्तलखाना येथे अनाधिकृत जनावरांचे कत्तल न होणे व तसेच मोहल्ल्यामध्ये कोणत्याही प्रकारचे चामडे, हाडे इत्यादी साठा करण्यात येवू नये याकरीता सदर ठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर असलेले मे. परमवीर अ. हमीद सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार प्रत्येक सुरक्षा रक्षक (8 तासांकरीता) प्रतिमहा रू.4125/- (सेवाकर वेगळा) या दराच्या निविदेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.355 :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मौजे हर्सूल येथील सर्व्हे नंबर 188/पैकी मधील 15.00 मीटर व 12.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्राचा मोबदला मिळकतधारकांनी खाजगी वाटाघाटीने देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार प्रकरणी बाधीत क्षेत्राचा मोबदला संबंधीतास देण्याची कार्यवाही करण्यात आली असून संयुक्त मोजणी नुसार 15.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात 257.50 चौ.मी. आणि 12.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्र 1296.00 चौ.मी. अशा प्रकारे दोन्ही रस्त्यात बाधीत क्षेत्र 1553.50 चौ.मी. आहे. नियमानुसार सर्व वजावटी करून देय मोबदला रक्कम रू.8,13,540/- होत आहे. मिळकत धारकाने वरील मिळकतीच्या रेखांकन मंजुरी नुसार रेखांकनातील अंतर्गत रस्ते, खुली जागा आणि उक्त 15.00 मीटर व 12.00 मीटर रूंद रस्त्यात बाधीत क्षेत्र हक्कसोड पत्रानुसार महानगरपालिकेस हस्तांतर करून उक्त क्षेत्र 7/12 उताऱ्यावर फेर क्रमांक 9684 नुसार महानगरपालिकेच्या नांवाची नोंद झालेली आहे. त्यानुसार उक्त बाधीत क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात व मालकीचे झालेले आहे. मुल्यांकनानुसार देय मोबदला रक्कम रूपये 8,13,540/- रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

करीता वरील प्रमाणे देय मोबदला रक्कम रूपये 8,13,540/- रक्कमेच्या मंजुरीस्तव भूसंपादन प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे हर्सूल येथील सर्व्हे नंबर 188/पैकी मधील 15.00 मीटर व 12.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्रासाठी मुल्यांकनानुसार निश्चीत केलेला देय मोबदला रक्कम रूपये 8,13,540/- मिळकतधारकास अदा करणेस व प्रस्तावात नमूद भूसंपादनास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.356 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड-ड विभागाचे साफसफाईच्या कामाच्या मासिक देयक अदाईचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चेउ कलम 69(1) अन्वये आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना प्रदान करण्यास मंजुरी देण्याबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड-ड विभागाचे साफसफाईच्या कामाच्या मासिक देयक अदाईचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चेउ कलम 69(1) अन्वये आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.357 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिडको नविन विभागाचे साफसफाईचे खाजगीकरण दिनांक 1 एप्रिल 2006 पासून झालेले आहे. कंत्राटदारांना देण्यात आलेले आदेश 30 मार्च 2007 रोजी संपत आहेत. नवीन निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. परंतु सदरील

प्रक्रीयेसाठी एप्रिलचा पूर्ण महिना लागेल व या एक महिन्याच्या कालावधीत साफसफाई न झाल्यास नागरीकांची गैरसोय होईल. ही होणारी गैरसोय टाळण्यासाठी जुन्याच कंत्राटदारांकडून पुर्वीच्याच दराप्रमाणे दिनांक 01 एप्रिल ते 30 एप्रिल 2007 या एक महिन्यासाठी काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको नविन विभागाचे साफसफाईचे खाजगीकरणाचे आदेश 30 मार्च 2007 रोजी संपत असल्याने नवीन निविदा पूर्ण होईपर्यंत नागरीकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी जुन्याच कंत्राटदारांकडून पुर्वीच्याच दराप्रमाणे दिनांक 01 एप्रिल ते 30 एप्रिल 2007 या एक महिन्यासाठी काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.358 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिडको नवीन विभागाचे किटकनाशक व अळीनाशक फवारणीचे खाजगीकरण दिनांक 01 एप्रिल 2006 पासून झालेले आहे. कंत्राटदारांना देण्यात आलेले आदेश 30 मार्च 2007 रोजी संपत आहे. नवीन निविदा वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. परंतु सदरील प्रक्रीयेसाठी एप्रिलचा पूर्ण महिना लागेल व या एक महिन्याच्या कालावधीत फवारणी न झाल्यास नागरीकांची गैरसोय होईल. ही होणारी गैरसोय टाळण्यासाठी जुन्याच कंत्राटदारांकडून पुर्वीच्याच दराप्रमाणे दिनांक 01 एप्रिल ते 30 एप्रिल 2007 या एक महिन्यासाठी काम करून घेण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको नविन विभागाचे खाजगीकरणाद्वारे किटकनाशक व अळीनाशक फवारणीचे आदेश 30 मार्च 2007 रोजी संपत असल्याने नवीन निविदा पूर्ण होईपर्यंत नागरीकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी जुन्याच कंत्राटदारांकडून पुर्वीच्याच दराप्रमाणे दिनांक 01 एप्रिल ते 30 एप्रिल 2007 या एक महिन्यासाठी काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.359 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्यातर्फे एकात्मिक विकास कार्यक्रमांतर्गत अंमरप्रित हॉटेल ते बीड बायपास पर्यंतच्या रस्ता विकासाच्या कामात बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करावयाच्या आहेत. त्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.40/9 दिनांक 7-7-2005 अन्वये खर्चास मान्यता घेण्यात आली.

त्याप्रमाणे कामासाठी निविदा सुचना जा.क्र.1088/05 अन्वये दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-1 निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सात कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकुण सात सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणेच्या आहेत.

| | |
|---|---|
| 1. मे. रॉकलाईन कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 26.6% कमी |
| 2. मे.स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 26% कमी |
| 3. श्री.व्ही.आर. महाजन | अं.प.दरापेक्षा 25.78% कमी |
| 4. मे.एल.के. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 23.786% कमी |
| 5. श्री. एस.पी. घुले | अं.प.दरापेक्षा 18.1% कमी |
| 6. श्री. सोहेल सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा 16% कमी |
| 7. मे. उदय इंजिनिअरींग | निविदा उघडण्यात आली नाही. |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या पाहता सर्वात कमी दर हा मे.रॉकलाईन कस्ट्रक्शन यांचा असून, त्यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.6% कमी असा दर दिलेला आहे. त्यास प्रशासकीय मान्यता झालेली आहे. करीता सर्वात कमी दराची निविदा मे.रॉक लाईन कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 26.6% कमी दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्यातर्फे एकात्मिक विकास कार्यक्रमांतर्गत अंमरप्रित हॉटेल ते बीड बायपास पर्यंतच्या रस्ता विकासाच्या कामात बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करावयाच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 26.6% कमी दराची मे. रॉकलाईन कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

(यावेळी मा.सभापती यांचेसह स्थायी समितीचे आठ सदस्यांचा कार्यकाळ संपत असून सभागृहाने जे निर्णय घेतले व प्रशासनाने केलेल्या विकास कामांचे संदर्भात स.सदस्य श्री.मुजीब खान, विनायक पांडे, सौ.लता दलाल, श्री.रविकांत गवळी, श्री.मिलींद दाभाडे, डॉ.आशा बिनवडे, मा.आयुक्त व यानंतर मा.सभापती यांनी यथोचित भाषण केले.)

"राष्ट्रगीता" नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद